# कृषि पणन विषयक बातम्या : जानेवारी 2024

दिव्य मराठी

## बीड जिल्हा 30-01-2024

**आयोजन •** मॅग्नेट प्रकल्पांतर्गत मानवलोक सेंटर ऑफ एक्सलन्स द्वारे पुढाकार

# शेतकऱ्यांना मॅग्नेटकडून सीताफळ निर्यात, व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

प्रतिनिधी | बीड

जिल्ह्यात सीताफळाची लागवड मोठ्या प्रमाणात आहे. याची निर्यात करून शेतकऱ्यांना नक्कीच चांगला परतावा मिळवता येतो. त्यासाठी आवश्यक उत्तम कृषी पद्धती सीताफळ म्हणजे ग्लोबल गॅप सर्टिफिकेशन बाबतचे प्रशिक्षण मॅग्नेट प्रकल्पांतर्गत मानवलोक सेंटर ऑफ एक्सलन्स द्वारे मंगळवार दि. २३ जानेवारी रोजी मानवलोक मुख्यालय अंबाजोगाई येथे शेतकऱ्यांना देण्यात आले.

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सीताफळाची शेती केली जात आहे. मात्र यंदा पाऊस वेळेवर आला नसल्याने बहार धरता आला नाही, भाव आला तेंव्हा माल नव्हता आणि माल लागला तेंव्हा भाव कमी झाले. सीताफळ बागेत एकावेळी गाडीभर माल निघत नाही. स्थानिक पातळीवर चांगला दर मिळत नाही. बाजार पेठेत घेऊन जाण्यासाठी वाहतुकीला परवडत नाही. या अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना छाटणी केव्हा करावी?, बहार केव्हा धरावा, बहार धरताना पिकाला आवश्यक खत-पाणी कधी, किती, कसे द्यावे? फळमाशीचा त्रास कसा नियंत्रणात ठेवावा? त्याचे व्यवस्थापन कसे करावे? पुढच्या वर्षीचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी संस्थेचे सहकार्यवाह लालासाहेब आगळे, पणन विभाग लातूर आणि मॅग्नेट पीआययुचे उप व्यवस्थापक बरडे, सीताफळ बागायतदार संघाचे रमेश निकस, गणेश गायकवाड, उपविभागीय कृषी अधिकारी शिनगारे, तालुका कृषी अधिकारी वडखेलकर, कृषी विभाग प्रमुख इरफान शेख यांची उपस्थिती होती.



जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मॅग्नेटकडून सीताफळ निर्यात आणि व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

# निर्यात धोरणाने नागपुरी संत्र्यांची कोंडी

## बांगलादेशाच्या आयात शुल्क वाढीमुळे निर्यात ठप्प; शेतकऱ्यांचे नुकसान

चंद्रशेखर महाजन :
सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २८ : आशियाई देशांत कृषीसह अनेक उत्पादनावर आयात शुल्क लावले जात नाही. मात्र, बांगलादेशाने २०१९ पासून संत्र्यांवर आयात शुल्क लागू केले. यातून खरेदीदारांची संख्या घटली आणि सर्वात मोठ्या निर्यातदार देश असलेल्या भारतातील शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. प्रतिकिलो ८८ रुपये शुल्क आकारल्याने भारतातून निर्यात थांबली आहे. यातून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

बांगलादेश हा संत्रे आयात करणारा सर्वात मोठा देश आहे. परंतु, भारताच्या काही धोरणांमुळे बांगलादेश सरकार नाराज झाले आणि यातून २०१९ पासून या देशाने नागपुरी संत्र्यांवर आयात शुल्क लावणे सुरू केले. सुरुवातीला फक्त पाच रुपये किलो असे शुल्क होते. मात्र २०२३ मध्ये ते प्रतिकिलो ८८ रुपये असे केले. नागपूरच्या कळमना बाजारपेठेत संत्र्यांना २० ते २५ हजार रुपये प्रतिटन दर मिळत आहे. बांगलादेशात निर्यात झाली असती तर हेच दर ४० हजार रुपये प्रतिटनाच्या पुढे गेले असते. बांगलादेशच्या निर्णयामुळे उत्पादकांना प्रतिटन किमान आठ ते १० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. कांदा निर्यातबंदीमुळे आक्रमक बांगलादेशात नागपुरी संत्र्यांची निर्यात १९ वर्षांपूर्वी सुरू झाली. तेव्हा बांगलादेशाने संत्र्यांवर आयात शुल्क लावले नव्हते.

मात्र, भारताने २०१९ मध्ये कांद्यावर निर्यात शुल्क लावले. याचा दूरगामी परिणाम तेथील राजकीय सत्तेवर झाला. कांदा मिळत नसल्याने आंदोलने झाली. त्यानंतर बांगलादेशाने नागपुरी संत्र्यांवर आयात शुल्क लावले.

### नागपुरी संत्र्यांचा इतिहास

नागपूरच्या संत्र्यांना दोनशे वर्षांचा इतिहास आहे. मराठा साम्राज्याचे राजे रघुजीराजे भोसले यांनी नेपाळ आणि पूर्वोत्तर राज्यातून आणलेल्या संत्र्यांच्या कलमांची नागपुरात लागवड केली होती. तेव्हापासून नागपुरातील शेतात संत्र्यांची लागवड केली जाऊ लागली. नागपुरातील संत्री हे मँडारिन गटात मोडतात. या संत्र्यांना 'जीआय टॅग' देखील मिळालेला आहे.

### नागपुरी संत्र्यांचे महत्त्व

संत्रे हे 'क जीवनसत्त्वा'चा सर्वोत्तम आणि स्वस्त स्रोतांपैकी एक आहे. मानवी शरीर इतर अनेक प्राण्यांमध्ये 'क जीवनसत्त्व' तयार होत नाही, म्हणूनच त्यांच्यासाठी हे जीवनसत्त्व अत्यंत आवश्यक आहे. लिंबूवर्गीय फळांमध्ये संत्री सर्वाधिक लोकप्रिय आहेत.

### बांगलादेशाने लागू केलेले आयात शुल्क (रुपये प्रति किलो)




सकाळ EXCLUSIVE

### विदर्भातील संत्रा प्रकल्प धोक्यात

केवळ निर्यातीवर अवलंबून राहणे आता परवडणारे नाही. संत्र्यांवर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू करण्यास सरकार कमी पडले आहे. महाराष्ट्र शासनाने नागपूर जिल्ह्यातील काटोल, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी, आणि वर्धा जिल्ह्यातील कारंजा घाडगे येथे संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू केले. काटोलचा प्रकल्प प्रक्रिया उद्योग तर मोर्शी व कारंजा (घाडगे) येथे निर्यात सुविधा केंद्र होते. तिन्ही प्रकल्प तीन वर्षांत बंद पडले. काटोलचा प्रकल्प अजूनही बंद असून, महाऑरेंजने कारंजा (घाडगे) येथील प्रकल्प २०१५-१६ मध्ये तर मोर्शीचा प्रकल्प २०१६-१७ मध्ये चालवायला घेतला आहे.



बांगलादेशाने आयात शुल्क वाढविले याला भारत सरकार जबाबदार आहे. जर, २०१९ मध्ये कांद्यावर निर्यात शुल्क लावले नसते तर बांगलादेशाने संत्र्यांवर शुल्क लावले नसते. सरकार संत्रा उत्पादकांसाठी काही धोरण आखत नाही, ही खरी अडचण आहे. शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला दिला तर संत्र्यांना गतवैभव प्राप्त होऊ शकते.
- **हुकुमचंद आमधरे**, सभापती (विपणन) बाजार समिती, मुंबई.



संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आहेत. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, एकात्मिक फलोत्पादन अभियान, स्मार्ट इत्यादी योजनांच्या माध्यमातून सामूहिक सुविधा केंद्र, संत्रा प्रक्रिया प्रकल्प शेतकरी उत्पादक कंपनी उभारणी करू शकते, आणि याचा परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना निश्चितच लाभ होईल.
- **मिलिंद शेंडे**, विभागीय कृषी सहसंचालक, कृषी विभाग



सरकारने संत्रा निर्यात करण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची गरज आहे. निर्यात धोरणात सरकार बदल करत नसल्यामुळे संत्रा उत्पादकांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.
- **राजानंद कावळे**, अध्यक्ष, शेतकरी व कामगार सुरक्षा संघ



केंद्र आणि राज्य सरकारने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष प्रक्रिया पॅकेज द्यावे. तसेच त्यांच्या परिसरातच संत्र्यांवर प्रक्रिया उद्योग सुरू करावे. ज्यामुळे शेतकऱ्यांना दुसऱ्या निर्यातदारांवर अवलंबून राहावे लागणार नाही.
- **ॲड. प्रकाश टेकाडे**, बागायतदार शेतकरी, कळमेश्वर

पुण्य नगरी

# पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस डाळिंब निर्यात

**पुणे** : पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस व्यावसायिक तत्त्वावर भारतातून पहिल्यांदाच डाळिंब निर्यात करण्यात आली आहे.

अपेडा, भारत सरकार, एन.पी.पी.ओ., महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व के. बी. एक्सपोर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरिकेत डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले असून, पहिली शिपमेंट नुकतीच फ्लोरिडा शहरात रवाना करण्यात आली. अधिकाऱ्यांच्या तपासणीनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. एकूण ३३६ बॉक्सेसमधून १ हजार ३४४ किलो भगव्या प्रतीचे डाळिंब हवाईमार्गे पाठविण्यात आले.

निर्यातीसाठीचे माइट वॉश, सोडियम हायपोक्लोराइड प्रक्रिया, वॉशिंग-ड्रइंग प्रक्रिया करून निश्चित केलेल्या मानांकनानुसार डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करणे आवश्यक आहे. अमेरिकेने घातलेली निर्यातबंदी



उठवल्याने डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधेचा वापर करून डाळिंब निर्यातीची संधी असून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात निर्यात करावी, असे आवाहन पणन मंडळाचे सहायक सरव्यवस्थापक सतीश वाघमोडे यांनी केले आहे. भारतीय डाळिंबामध्ये कर्करोगापासून लढण्यासाठी लागणारे अँटी ऑक्सिडंट असल्याने अमेरिकेत डाळिंबाला असलेली वाढती मागणी लक्षात घेऊन जास्तीत जास्त उत्पादकांनी या सुविधेचा वापर करावा, असेही वाघमोडे यांनी कळविले आहे.

सन २०१७-२०१८ मध्ये डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अमेरिकेने भारतातून डाळिंब आयात करण्यास बंदी घातली होती. त्यामुळे गेली पाच-सहा वर्षे अमेरिकेस डाळिंब निर्यात होऊ शकली नाही. बंदी उठवणेबाबत अपेडा व एन.पी.पी.ओ. भारत सरकार यांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा करून ही निर्यात बंदी उठवावी यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यानुसार सन २०२२ पासून अमेरिकेने घातलेली निर्यातबंदी उठवली. मात्र, त्यासाठी काही नियम व अटी घालण्यात आल्या आहेत.

कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विकिरण सुविधा केंद्र या ठिकाणी अमेरिकन निरीक्षक यांच्या उपस्थितीत डोझमॅपिंग करून सुविधा अद्ययावत करण्यात आली.

या प्रसंगी एन.पी.पी.ओ. मुंबईचे असिस्टंट डायरेक्टर एन. के. मीना, अपेडा मुंबईचे सहायक व्यवस्थापक पी. ए. बामने, निर्यातदार कौशल खक्कर, कृषी पणन मंडळाचे सहायक सरव्यवस्थापक सतीश वाघमोडे, व्यवस्थापक डॉ. केदार तुपे तसेच एन.पी.पी.ओ., अपेडा व पणन मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी या सर्वांच्या उपस्थितीत अमेरिकन निरीक्षक लुईस यांनी डाळिंबाच्या कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला व व्यावसायिक तत्त्वावर अमेरिकेतील फ्लोरिडा या शहरात पाठविण्यात आले. या निर्यातीनंतर अमेरिकेतील मोठी बाजारपेठ खुली होईल, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

अमेरिकन मार्केटमध्ये भारतीय डाळिंबाचा बाजार हिस्सा वाढवण्यासाठी अपेडा, एन.पी.पी.ओ., कृषी पणन मंडळ आणि निर्यातदार अधिकाऱ्यांसोबत काम करण्यासाठी अनेक पावले उचलत आहेत. अमेरिकेतील कॅलिफोर्निया डाळिंबाच्या जातीपेक्षा भारतीय डाळिंबाच्या जातीला जास्त मागणी आहे.

Smart Pune Edition
Jan 29, 2024 Page No. 04
Powered by : eReleGo.com

पुढारी

# 'मिलेट महोत्सवात' ३० लाखांची उलाढाल

## पणन मंडळामार्फत देशांतर्गत व्यापाराला बळकटी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्य कृषी पणन मंडळाने नुकत्याच आयोजित केलेल्या चार दिवसांच्या मिलेट महोत्सवात सुमारे २५ ते ३० लाख रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियेमध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांनी सहभाग घेतला.**

पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पौष्टिक



तृणधान्य वर्षाच्या निमित्ताने येथील गणेश कला क्रीडा रंगमंचमध्ये १७ ते २१ जानेवारीदरम्यान मिलेट महोत्सवाचे आयोजन पणन मंडळाच्या पुढाकाराने करण्यात आले होते. त्याला पुणेकर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या महोत्सवामध्ये मिलेट उत्पादकांना ४० स्टॉल उपलब्ध करून दिले होते आणि विविध संस्थांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, ग्राहक अशा साधारणत: ३० ते ३५ हजार व्यक्तींनी भेट देऊन मिलेटच्या नावीन्यपूर्ण उत्पादनांची माहिती घेत उत्पादनांची खरेदी केल्याचे त्यांनी सांगितले.

ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्राही आदी तृणधान्ये व त्यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली- मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नावीन्यपूर्ण अशी असंख्य उत्पादने थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी ग्राहकांना मिळाली. देशांतर्गत व्यापाराला बळकटी येण्याबरोबरच निर्यातीसाठी ग्राहक व मिलेट उत्पादकांमध्ये समन्वय घडवून आणण्यास मिलेट महोत्सव उपयुक्त ठरल्याचे त्यांनी सांगितले.

My Gramin Edition
Jan 29, 2024 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# बाजार समित्या राष्ट्रीयीकरणाच्या हालचाली

## समिती स्थापन ; पणन, महसूल आणि कृषिमंत्र्यांचा समावेश



**गणेश कोरे** : ॲग्रोवन वृत्तसेवा दि.२९/०१/२०२४

### प्रस्तावित सुधारणांची मुख्य वैशिष्ट्ये...

- पशुधनाच्या संबंधातील पणनाचे विनियमन करण्याकरिता तरतुदी.
- राष्ट्रीय नामांकित बाजारतळ व त्याच्याशी संबंधित आणि आनुषंगिक बाबींकरता तरतुदी.
- विविध प्रकारचे बाजार स्थापन करण्याबाबत तरतुदी.
- बाजार उपतळ म्हणून वखार, सायलो, शीतगृह, इत्यादींकरता तरतुदी.
- ई-नाम, ई-व्यापारासाठीच्या तरतुदी.

पुणे : बाजार समित्यांना पारंपरिक कायद्यातून बाहेर काढत, आमूलाग्र बदलांसाठी २०१८ साली केलेल्या सुधारणांना महाविकास आघाडीने खोडा घातला होता. मात्र आता पुन्हा महायुतीच्या सरकारने बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याची प्रक्रिया सुरू केली असून, पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री धनंजय मुंडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांच्यासह मुख्य सचिव आणि कृषी आणि पणन सचिवांची नियुक्ती केली आहे.

शेतमाल पणन सुधारणांमधील सर्वात महत्त्वाच्या असणाऱ्या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देणारी सुधारणा राज्यपालांच्या सहीने २०१८ मध्ये मंजूर करण्यात आली होती. मात्र यानंतरच्या सत्तांतरानंतर महाविकास आघाडी सरकारने या विधेयकाला विरोध करत सुधारणांची प्रक्रिया थांबविली होती. **पान २ वर »**

**गणेश कोरे** : ॲग्रोवन वृत्तसेवा दि.२९/०१/२०२४

# बाजार समित्या राष्ट्रीयीकरणाच्या हालचाली

» पान १ वरून

या सुधारणेमुळे एकूण आवकेच्या ३० टक्के शेतमाल ३ किंवा अधिक राज्यांतून येत असलेल्या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार होता. आता पुन्हा ही प्रक्रिया सुरू केल्याने राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर सारख्या बाजार समित्या निवडणुकांमधून वगळण्यात येणार आहे. या समित्यांवर आता शासन नियुक्त २३ जणांच्या प्रशासकीय मंडळाची नियुक्तीची शिफारस जुन्या विधेयकात होती. यामुळे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखालील समिती कोणत्या सुधारणा सुचविते याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. केंद्र शासनाच्या नवीन मॉडेल विविध पणन सुधारणा राज्य शासनाने केल्या आहेत. यामधील सर्वांत महत्त्वपूर्ण सुधारणांमध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील सर्वांत मोठी आर्थिक सत्ता केंद्र असलेल्या मोठ्या बाजार समित्या स्वतःच्या ताब्यात घेण्याची राजकीय खेळी भाजप सरकारने २०१८ मध्येच केली होती. या खेळीला आता यश येण्याची शक्यता निर्माण झाली असून, बाजार समित्यांवर सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील शासन नियुक्त प्रशासकीय मंडळाची नियुक्तीची शक्यता आहे.

**विशेष वस्तू बाजाराची होणार स्थापना**

बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा प्राप्त झाल्यानंतर या बाजार समित्यांना विशेष वस्तूंचा बाजारदेखील घोषित करता येणार आहे. यामध्ये फळे, भाजीपाला, फुले, कांदा, सफरचंद, संत्रा, मनुका, हळद, काजू, कापूस, औषधी आणि सुगंधी वनस्पती, पशुधन (गुरे, शेळी, मेंढी, गाढव, घोडा, मासळी, कुकुट आदी) आणि इतर कोणतेही पाच बाजार स्थापन करता येणार आहे.

**संचालक मंडळ होणार तातडीने बरखास्त** : राज्य शासनाने राष्ट्रीय नामांकित बाजार तळाची अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर लगेच विद्यमान बाजार समिती कार्य करणे बंद करील आणि सर्व विद्यमान समिती सदस्य हे आपले पद धारण करणे बंद करतील असे २०१८ च्या अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे.

## असे असेल प्रशासकीय मंडळ

- सभापती - पणनमंत्री अथवा राज्य शासनास योग्य वाटेल अशी कोणतीही व्यक्ती.
- उपसभापती - अपर निबंधक (सहकार) पदापेक्षा कमी दर्जाची नसेल असे अधिकारी.
- महसूल विभागातील एक या प्रमाणे ६ शेतकरी प्रतिनिधी.
- दोन राज्यांतील सरकारने शिफारस केलेले २ शेतकरी प्रतिनिधी.
- संबंधित बाजार समितीमधील पाच परवानाधारक व्यापारी.
- कृषी प्रक्रिया संस्थेचा १ प्रतिनिधी.
- केंद्रीय किंवा राज्य वखार महामंडळासह, अधिकृत वखार चालकांचे प्रतिनिधी.
- भारतीय रेल्वेचा प्रतिनिधी.
- सीमा शुल्क विभागाचा प्रतिनिधी.
- बाजाराला सेवा देणाऱ्या बँकेचा प्रतिनिधी.
- भारत सरकारच्या कृषी पणन सल्लागार विभागाचा अवर सचिव दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती.
- महानगरपालिकेचे आयुक्त किंवा प्रतिनिधी.
- सचिवपदी सहनिबंधक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला प्रतिनिधी.

सकाळ अॅग्रोवन
रविवार, २८ जानेवारी २०२४



# अमेरिकेतील डाळिंब निर्यातीस पुन्हा सुरुवात

## 'पणन'च्या विकिरण सुविधा केंद्रातून दीड टन डाळिंब निर्यात

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : ''अमेरिकेने घातलेली निर्यात बंदी उठवल्याने डाळिंब उत्पादकांना पणन मंडळाच्या वाशी (नवी मुंबई) येथील विकिरण प्रक्रिया करून सुमारे दीड टन डाळिंब निर्यात करण्यात आली आहे,'' अशी माहिती पणन मंडळाचे सहायक सरव्यवस्थापक सतीश वाघमोडे यांनी दिली.

'''अपेडा', 'एनपीपीओ' आणि राज्य कृषी पणन मंडळ व के. बी. एक्सपोर्टतर्फे अमेरिकेत डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले आहे. पहिली शिपमेंट नुकतीच फ्लोरिडा शहरात रवाना करण्यात आली. अधिकाऱ्यांच्या तपासणीनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. एकूण ३३६ बॉक्सेसमधून १ हजार ३४४ किलो भगव्या प्रतीचे डाळिंब हवाई मार्गे पाठविण्यात आले,'' असे वाघमोडे यांनी सांगितले.



''निर्यातीसाठीचे माईट वॉश, सोडिअम हायपोक्लोराइड प्रक्रिया, 'वॉशिंग-ड्रॉइंग प्रक्रिया करून निश्चित केलेल्या मानांकनानुसार डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात येत आहे. याची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. भारतीय डाळिंबामध्ये कर्करोगासह अन्य रोगांविरूद्ध लढण्यासाठी लागणारी अँटी ऑक्सिडंट्स आहेत. त्यामुळे अमेरिकेत डाळिंबाला असलेली वाढती मागणी लक्षात घेऊन अधिकाधिक उत्पादकांनी या सुविधेचा वापर करावा,'' असे आवाहन वाघमोडे यांनी केले.

अॅग्रोवन दि. २६/०१/२०२४

# मिलेट महोत्सवात ३० लाखांची उलाढाल

**पुणे** : आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाचे औचित्य साधून गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित केलेल्या मिलेट महोत्सवाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. या महोत्सवात सुमारे २५ ते ३० लाख रुपयांची उलाढाल झाली.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रिया उद्योगात कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांनी सहभाग घेतला. या वेळी मिलेट उत्पादकांना ४० स्टॉल देण्यात आले होते. ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्राही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी उत्पादने थेट उत्पादकांकडून उपलब्ध करून देण्यात आली.

''महोत्सवास साधारणतः ३० ते ३५ हजार व्यक्तींनी भेट देऊन मिलेटच्या नावीन्यपूर्ण उत्पादनांची माहिती घेतली. उत्पादने खरेदी केली'', अशी माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2024-01-24 | Page- 2
epaper.mahamtb.con

# ‘मिलेट महोत्सवा’ची यशस्वी सांगता

**पुणे, दि. २३ : प्रतिनिधी**

‘मिलेट महोत्सव २०२४’ चे आयोजन ‘श्री गणेश कला क्रीडा रंगमंच’ स्वारगेट, पुणे येथे दि. १७ ते २१ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांचा सहभाग होता. या महोत्सवामध्ये मिलेट उत्पादकांना ४० स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते. ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व ज्वारीचा रवा, उत्पादने थेट उत्पादकांद्वारे प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. याबरोबरच तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन असा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी महोत्सवातील मिलेट उत्पादकांशी मिलेटच्या मार्केटिंगबाबत येत असलेल्या अडचणींबाबत चर्चा केली. या महोत्सव कालावधीत मिलेट उत्पादन, मुल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यांस ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला असून देशांतर्गत व्यापार व निर्यातीसाठी ग्राहक व मिलेट उत्पादक यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्यात आला. नववर्षाची सुरुवात कृषी पणन मंडळाने आरोग्यपूर्ण अशा या पहिल्या मिलेट (तृणधान्य) महोत्सवाद्वारे केलेली असून यांस ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद मिळालेला असून असा प्रकारचे महोत्सव या पुढेही आयोजित करून ग्राहक व उत्पादकांकरिता संधी उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली.

व्यापार विकास विभागाचे साहाय्यक सरव्यवस्थापक मंगेश कदम, व्यवस्थापक सचिन माने, तानाजी देवकुळे, तसेच उमाकांत वाघ, आनंद शुक्ल यांनी परिश्रम घेतले. महोत्सवास विविध संस्थांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी/कर्मचारी, शेतकरी, पुणेकर ग्राहक अशा साधारणत: ३० ते ३५ हजार व्यक्तींनी समक्ष भेट देऊन मिलेटच्या नावीन्यपूर्ण उत्पादनांची माहिती घेऊन उत्पादने खरेदी केली. महोत्सवाद्वारे सुमारे २५ ते ३० लाखांची उलाढाल झाली. यापुढील काळातही कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून अशा प्रकारचे महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

पुण्य नगरी

# पणन मंडळाच्या 'मिलेट' महोत्सवात ३० लाखांची उलाढाल

**पुणे : प्रतिनिधी**

कृषी पणन मंडळाच्या 'मिलेट' (तृणधान्य) महोत्सवास तब्बल ३० ते ३५ हजार नागरिकांनी भेट देऊन मिलेटच्या नावीन्यपूर्ण उत्पादनांची माहिती घेत महोत्सवात २५ ते ३० लाखांची उलाढाल झाल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

महोत्सवास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून यशस्वी सांगता करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. यानिमित्त देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले. तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्त्वामुळे सामान्य ग्राहक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असल्याने 'मिलेट महोत्सव २०२४'चे आयोजन श्री गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे करण्यात आले होते.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांचा सहभाग होता. या महोत्सवामध्ये मिलेट उत्पादकांना ४० स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते. ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा,



कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीन्यपूर्ण अशी असंख्य उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती.

हा महोत्सव यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी महोत्सवातील मिलेट उत्पादकांशी मिलेटच्या मार्केटिंगबाबत येत असलेल्या अडचणींबाबत चर्चा केली. या महोत्सव कालावधीत मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यास ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला असून देशांतर्गत व्यापार व निर्यातीसाठी ग्राहक व मिलेट उत्पादक यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्यात आला. नववर्षाची सुरुवात कृषी पणन मंडळाने आरोग्यपूर्ण अशा या पहिल्या 'मिलेट' (तृणधान्य) महोत्सवाद्वारे केलेली असून यांस ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. अशा प्रकारचे महोत्सव यापुढेही आयोजित करून ग्राहक व उत्पादकांकरिता संधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

'मिलेट' (तृणधान्य) महोत्सव यशस्वी करण्यासाठी पणनमंत्री अब्दुल सत्तार, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे मंगेश कदम, सचिन माने, तानाजी देवकुळे, उमाकांत वाघ, आनंद शुक्ल यांनी परिश्रम घेतले.

नवभारत

# मिलेट महोत्सव को मिला नागरिकों का अच्छा रिस्पांस



■ **पुणे** (सं). विपणन मंत्री अब्दुल सत्तार के मार्गदर्शन में अंतर्राष्ट्रीय पौष्टिक अनाज वर्ष के अवसर पर गणेश कला क्रीड़ा रंगमंच पर 17 से 21 जनवरी तक आयोजित मिलेट महोत्सव में नागरिकों ने उत्साहपूर्वक हिस्सा लिया. महोत्सव से करीब 25 से 30 लाख की आय हुई. महोत्सव में राज्य के विभिन्न हिस्सों से अनाज उत्पादकों, प्रसंस्करण में काम करने वाले बचत समूहों, सहकारी समितियों, किसान उत्पादक कंपनियों, स्टार्ट-अप कंपनियों ने भाग लिया. इस महोत्सव में मिलेट उत्पादकों को 40 स्टॉल उपलब्ध कराये गए. उपभोक्ताओं को असली ज्वार, बाजरी, नाचनी, भगर, राला, सामा, कोदराही अनाज और इनसे तैयार ज्वार रवा, बाजरा लाहिया, रागी बिस्कुट, ज्वार इडली-मिक्स, रागी डोसा मिक्स आदि जैसे कई नवीन उत्पाद सीधे निर्माआतों से उपलब्ध कराए गए. इसके साथ ही मिलेट उत्पादन, मूल्य वर्धित प्रसंस्करण उत्पाद, स्वास्थ्य महत्व, क्रेता-विक्रेता बैठकों पर प्रसिद्ध विशेषज्ञों द्वारा निर्देशित व्याख्यान जैसे विभिन्न कार्यक्रम आयोजित किए गए. यह मिलेट महोत्सव घरेलू व्यापार और निर्यात के लिए उपभोक्ताओं और मिलेट उत्पादकों के बीच समन्वय बनाने में सहायक होगा. विभाग स्तर एवं जिला स्तर पर ऐसे महोत्सव आयोजित किए जाएंगे. संजय कदम ने बताया कि महोत्सव में लगभग 30 से 35 हजार लोगों ने मिलेट के नवीन उत्पादों को खरीदा.

Pune-plus Edition
25-january-2024 Page No. 2
epaper.enavabharat.com

# भारतीय शेतीमाल तपासणी युरोपने केली अधिक काटेकोर

## कीडनाशक अवशेषांसह वाढणार विषारी घटकांवर नियंत्रण

**पुणे (प्रतिनिधी) :** युरोपीय देशांत आयात होणाऱ्या भारतीय शेतीमालांमध्ये कीडनाशकांचे अंश व अफ्लाटॉक्सीन या विषारी घटकांचा धोका टाळण्यासाठी तपासणी प्रक्रिया अधिक काटेकोर करण्याचा निर्णय युरोपीय महासंघाने घेतला. त्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यामध्ये कढीपत्ता, भुईमूग, नागवेली (खाऊ) पाने व ढोबळी मिरची आदी शेतीमालांच्या तपासणीबाबत अधिकृत नियंत्रण पद्धतीत वाढ केल्याची माहिती 'अपेडा'ने दिली आहे.

भारतातून युरोपीय देशांमध्ये निर्यात होणाऱ्या विविध शेतीमालांमध्ये कढीपत्ता, भुईमूग, ढोबळी मिरची, नागवेली पाने आदींचा समावेश होतो. यामध्ये कीडनाशकांचे अवशेष व अफ्लाटॉक्सीन सारख्या शेतीमालाचे प्रमाण आढळण्याविषयी कमाल अवशेष मर्यादा (एमआरएल) निश्चित करण्यात आली आहे. शेतीमाल तपासणी प्रक्रियेसंबंधीच्या वर्गवारीत कढीपत्याचा समावेश परिशिष्ट एक (अनेक्शर वन) वरून दुसऱ्या परिशिष्टात करण्यात आला आहे. तपासणीच्या अधिकृत नियंत्रण प्रक्रियेत वाढ केली आहे. युरोपात मालाचा प्रवेश झाल्यानंतर नमुन्यातील घटकांचा आढळ व तपासणी या प्रक्रियेची तीव्रता वा संख्या ५० टक्के ठेवण्यात आली. त्यावरील अधिकृत नियंत्रण वाढवले आहे. त्याचबरोबर संबंधित शेतीमालाच्या नमुन्याची कीडनाशक अवशेषांसाठी तपासणी झाली आहे व त्यात युरोपीय महासंघाच्या कायदा नियमावलीनुसारचा अवशेषांचा आढळ नाही असे अधिकृत प्रमाणपत्र गरजेचे आहे. भारतीय भुईमुगात अफ्लाटॉक्सीन या विषारी घटकाचा आढळ होऊ शकतो व त्याचा मानवी आरोग्याला धोका पोहोचू शकतो या मुद्द्याला युरोपीय महासंघाने अधिक महत्व दिले आहे. त्यादृष्टीने त्याच्या तपासण्याही ५० टक्क्यांनी वाढविण्यात आल्या आहेत.

भारतीय नागवेलीची (खाऊची) पाने ज्या युरोपीय देशात आयात होतील तेथे अधिकृत यंत्रणेमार्फत त्यावरील नियंत्रण पातळीची संख्या वाढविली आहे. त्याचा समावेश युरोपीय कायदे नियमवलीच्या परिशिष्ट दोनवरून एकमध्ये केला आहे. भारतीय ढोबळी मिरचीचा समावेश सद्यःस्थितीत परिशिष्ट दोनमध्ये आहे. मात्र नमुन्यातील घटकांचा आढळ व तपासणी या प्रक्रियेची संख्या २० वरून १० टक्क्यांवर ठेवली आहे.

### या शेतीमालाची होणार अधिक काटेकोर तपासणी


कढीपत्ता


शेंगदाणा


नागवेलीची पाने


ढोबळी मिरची

### विविध घटकांवर होतोय नियंत्रण

केवळ भुईमूगच नव्हे तर अफ्लाटॉक्सीनच्या आढळाचा धोका ओळखून भारतीय जायफळाच्या तापसण्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय युरोपीय महासंघाने जुलै २०१९ पासूनच घेतला आहे. त्यानुसार युरोपीय सदस्य देशांकडून उपलब्ध होत असलेल्या माहितीच्या आधारे या नियमावलीच्या पूर्ततेमध्ये सुधारणा झाली आहे. अन्नपदार्थांबरोबरच युरोपीय देशांव्यतिरिक्त अन्य देशांतून येणाऱ्या पशुखाद्यांसाठीही नियमावली निश्चित कर आली आहे. यामध्ये कीडनाशक अवशेष व अफ्लाटॉक्सीन यांच्या व्यतिरिक्त बुरशीवर आधारित अन्य विषारी पदार्थ, सूक्ष्मजीवांचा संसर्ग वा दूषितीकरण, पेंटाक्लोरोफिनॉल व डायक्झीन्स आदी घटकांच्या आढळावरही नियंत्रण ठेवण्यात येत आहे. युरोपीय महासंघाच्या (रास्फ RASFF) या संस्थेकडून अलीकडेच इशारा देण्यात आला आहे. यामध्ये दूषित झालेले अन्न व अप्राणीजन्य पशुखाद्यामुळे मानवी आरोग्याला प्रत्यश्र किंवा अप्रत्यक्ष गंभीर धोके उद्‌भवू शकतील असे सूचित करण्यात आले आहे. त्यादृष्टीनेच मानवी आरोग्याचे संरक्षणाच्या दृष्टीने युरोपीय सदस्य देशांकडून अन्नपदार्थांचे वर्गीकरण परिशिष्ट एक व दोनमध्ये करण्यात आले आहे. रास्फद्वारा उपलब्ध तपशीलाचा आधारे कीडनाशकांच्या अवशेषांमुळे इजिप्तमधून येणाऱ्या संत्र्यांपासून नवा धोका सूचित करण्यात आला आहे. अशा शेतीमालांना परिशिष्ट एकमध्ये वर्ग केले आहे. त्याचबरोबर भारत व पाकिस्तानातून येणाऱ्या भातामध्येही कीडनाशकांच्या अवशेषांचा धोका सूचित केला असून त्यादृष्टीने युरोपीय महासंघासाठी अधिकृत नियंत्रण पातळी वाढविणे गरजेचे ठरले.

दि. 24/01/2024

# कृषि पणन मंडल द्वारा 17 से 21 जनवरी का मिलेट महोत्सव संपन्न



पुणे, २३ जनवरी (भा.प्र.): संयुक्त राष्ट्र ने वर्ष २०२३ को 'अंतर्राष्ट्रीय पौष्टिक अनाज वर्ष' के रूप में मनाया है। चलो भीइस अवसर पर देशभर में विभिन्न गतिविधियां आयोजित की गईं। अनाजों की पौष्टिकता के कारण आम उपभोक्ताभारी आकर्षण के कारण 'श्री गणेश कला क्रीड़ा रंगमंच' द्वारा 'बाजरा महोत्सव-२०२४' का आयोजन किया जाता है। यह १७ से २१ जनवरी, २०२४ तक स्वारगेट, पुणे में आयोजित किया गया था। चलो भीमहोत्सव का उद्घाटन बुधवार १७ जनवरी को अल्पसंख्यक विकास मंत्री अब्दुल सत्तार द्वारा किया गयाऔकाफ़, विपणन, महाराष्ट्र राज्य और अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड, पुणे द्वारा संचालित। त्योहार के दौरान, राज्य के विभिन्न हिस्सों से खाद्यान्न उत्पादक, बचत प्रक्रिया में काम करते हैं समूह, सहकारी समितियाँ, किसान उत्पादक कंपनियाँ, स्टार्ट-अप कंपनियाँ शामिल थीं। इस त्यौहार में बाजरानिर्माताओं को ४० स्टॉल उपलब्ध कराए गए। उपभोक्ता प्रामाणिक ज्वार, बाजरी, रागी, भागर, का आनंद ले सकते हैं।राला, सामा, कोदरा जैसे अनाज और इनसे तैयार बाजरा रवा, बाजरे की भूसी,रागी बिस्कुट, सोरघम इडली-मिक्स, रागी डोसा मिक्स आदि जैसे कई नवीन उत्पाद। निर्माताओं द्वारा प्रदर्शन के साथ-साथ बिक्री के लिए भी उपलब्ध कराया जाता है। इसके साथ ही बाजरा उत्पादन भी, मूल्य वर्धित प्रसंस्करण उत्पादों, स्वास्थ्य महत्व पर प्रसिद्ध विशेषज्ञों द्वारा निर्देशित व्याख्यान,क्रेता-विक्रेता मिलन का भव्य कार्यक्रम आयोजित किया गया। कृषि विपणन बोर्ड के कार्यकारी निदेशक श्री. संजय कदम, महाप्रबंधक, महोत्सव में विनायक कोकरे ने बाजरा उत्पादकों से बाजरा के विपणन पर चर्चा कीसमस्याओं पर चर्चा की. बाजरा उत्पादन, मूल्य वर्धित प्रसंस्करण उत्पाद, स्वास्थ्य महत्व पर प्रसिद्ध विशेषज्ञों द्वारा मार्गदर्शन प्रदान किया गया। इस पर ग्राहकों की प्रतिक्रियाघरेलू व्यापार और निर्यात के लिए उपभोक्ताओं और बाजरा उत्पादकों के बीच समन्वय स्थापित करकेलाया गया था नये साल की शुरूआत

नवराष्ट्र

# मिलेट महोत्सवात ३० लाखांची उलाढाल

पुणे, (वा.) कृषी पणन मंडळाच्यावतीने आयोजित मिलेट महोत्सवात सुमारे २५ ते ३० लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. सुमारे तीस ते पसतीस हजार नागरीकांनी या प्रदर्शनाला भेट दिली आहे. नुकतेच पणन मंडळाच्यावतीने तृणधान्य (मिलेट) महोत्सवाचे आयोजन केले गेले होते. यासंदर्भात कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी माहीती दिली आहे. या महोत्सवात विविध संस्थांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी/कर्मचारी, शेतकरी, पुणेकर ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिला. महोत्सवात मिलेटच्या नाविन्यपुर्ण उत्पादनांची माहीती घेऊन उत्पादने खरेदी केली. महोत्सवाद्वारे सुमारे २५ चे ३० लाखांची उलाढाल झालेली असुन यापुढील काळातही कृषि पणन मंडळाच्या माध्यमातुन विभागस्तरावर व जिल्हास्तरावर अशा प्रकारचे महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याचे कदम यांनी नमूद केले. तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्वामुळे सामान्य ग्राहक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असल्याने महोत्सव आयोजित केला गेला होता.

Pune Plus Edition
24 January 2024 Page No. 1
epaper.navarashtra.com

सकाळ

# शेतकरी संस्था बळकटीचे प्रयत्न

## तंत्रज्ञान कार्यशाळेत पणनमंत्री अब्दुल सत्तार यांची ग्वाही

**मार्केट यार्ड, ता. १८ :** "फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरिता एक हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. या माध्यमातून राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट व सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न करण्यात येईल," अशी ग्वाही पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.




बालेवाडी : शेतकरी उत्पादक संस्थांसाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेत दीपप्रज्वलन करताना पणनमंत्री अब्दुल सत्तार. या वेळी उपस्थित मान्यवर.

बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थांसाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेचे उद्‌घाटन सत्तार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, 'मॅग्नेट'चे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उपप्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, 'केपीएमजी'च्या सहयोगी संचालक मेघना पांडे, विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. सत्तार यांच्या हस्ते कृषी तंत्रज्ञान कार्यशाळा-मॅग्नेट प्रकल्पांतर्गत नवीन व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानासाठी अर्थसाहाय्य पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

सत्तार म्हणाले, "राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देशविदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, नाशवंत मालाला मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरीत्या करता यावी, यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरूप बदलही करण्यात येत आहेत. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फूलपिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणे या बाबींचा समावेश केलेला आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल." कोकरे यांनी मॅग्नेट प्रकल्पाविषयी माहिती दिली.

Pune, Main1
19/01/2024 Page No. 3

# शेतीहितासाठी कायद्याची निर्मिती

## पणन मंत्री अब्दुल सत्तार यांची माहिती

**प्रभात वृत्तसेवा** दि. 19/01/2024

**पुणे, दि. १८** - राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देश व विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरूप बदलही करण्यात येत आहेत, अशी माहिती पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.

बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेसाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उप प्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, केपीएमजीच्या सहयोगी संचालक मेघना पांडे, विविध शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

पणन मंत्री सत्तार म्हणाले, फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरीता १ हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फूल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे.

नवभारत

# आहार में मिलेट का उपयोग बढ़ाएं

## कृषि विपणन मंत्री अब्दुल सत्तार ने मिलेट महोत्सव के उद्घाटन पर कहा

■ **पुणे**, ब्यूरो. स्वास्थ्य की दृष्टि से महत्वपूर्ण पौष्टिक मिलेट का उपयोग रोजमर्रा के आहार में बढ़ाकर नागरिकों से खुद को तंदुरूस्त रखने की अपील विपणन मंत्री अब्दुल सत्तार ने की. महाराष्ट्र राज्य कृषि विपणन निगम की ओर से गणेश कला क्रीड़ा मंच स्वारगेट में आयोजित मिलेट महोत्सव 2024 के उद्घाटन के अवसर पर अब्दुल सत्तार बोल रहे थे. इस मौके पर विपणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषि विपणन मंडल के कार्यकारी संचालक संजय कदम, महाप्रबंधक विनायक कोकरे, उपमहाप्रबंधक राजेंद्र महाजन आदि उपस्थित थे. अब्दुल सत्तार ने कहा कि आने वाली पीढ़ियों को मिलेट अनाज का महत्व समझाना आवश्यक है. इसके लिए ग्राहकों में मिलेट का प्रचार, प्रसार करना जरूरी है. इस महोत्सव के असवर पर आम ग्राहकों को मिलेट के फायदों की जानकारी दी जाए. ग्राहक मिलेट महोत्सव में आकर खदीदी सहित विभिन्न कार्यक्रमों का लाभ उठाएं, यह अपील भी उन्होंने की.



### प्रक्रियाकृत खाद्य पदार्थ खाने से बचे

- मंत्री सत्तार ने कहा कि नागरिक रासायिनक प्रक्रिया किए गए खाद्यपदार्थों से बचें. स्वस्थ रहना ही सबसे बड़ी संपत्ति है. मिलेट आहार से स्वास्थ्य पर अच्छे परिणाम होते हैं. इसीलिए संयुक्त राष्ट्रसंघ ने वर्ष 2023 मिलेट वर्ष के रूप में मनाया. ऐसे उपक्रमों में निरंतरता रखने के लिए मिलेट महोत्सव शुरू किया गया है. मिलेट महोत्सव का कांसेप्ट बेहद अच्छा है.
- महोत्सव में सामान्य ग्राहकों को स्टॉल्स के माध्यम से विभिन्न मिलेट पदार्थ खदीदने के लिए प्रोत्साहन मिलेगा.

### स्वयं सहायता गुटों को दी जाएगी मदद

महिला स्वयंसहायता गुटों का उत्पादन बढ़ाने और उनका व्यवसाय को बढ़ावा देने के लिए उन्हें स्थायी स्टॉल के माध्यम से महापालिका स्तर पर मार्केट उपलब्ध कराने के लिए प्रयास किए जाएंगे. महिला स्वयंसहायता गुटों को लोन लेते समय, व्यवसाय करते समय अगर कोई दिक्कत आती है तो उनकी समस्याओं का समाधान ढूंढने के लिए सरकारी स्तर पर प्रयास करने का आश्वासन भी मंत्री अब्दुल सत्तार ने दिया. कृषि विपणन मंडल के कार्यकारी संचालक संजय कदम ने कहा मिलेट को लेकर ग्राहकों में जागरूकता फैलाने के उद्देश्य से राज्य के हर जिले में इस तरह के महोत्सव आयोजित किए जाएंगे.

### आहार रैली निकाली गई

इस महोत्सव में बाजरा उत्पादों, मूल्य संवर्धित प्रसंस्करण उत्पादों, स्वास्थ्य महत्व, क्रेता-विक्रेता बैठक आदि पर प्रसिद्ध विशेषज्ञों द्वारा निर्देशित व्याख्यान होंगे. उन्होंने उपभोक्ताओं से मिलेट खरीदने सहित विभिन्न कार्यक्रमों का लाभ उठाने की भी अपील की. इस मौके पर मंत्री सत्तार ने विभिन्न स्टालों का निरीक्षण किया और मिलेट के प्रति जागरूकता के लिए आयोजित बाइक रैली को हरी झंडी दिखाकर रवाना किया. रैली सारस बाग चौक-एलबीएस रोड-म्हात्रे ब्रिज-नाल स्टॉप-कार्वे रोड-डेक्कन-तिलक रोड होते हुए गणेश कला क्रीड़ा रंगमंच पर समाप्त हुई. दूसरी रैली सारस बाग चौक-शिलाई चौक-स्वारगेट-सेवन लव चौक-गंगाधाम चौक-बिबवेवाड़ी चौक, महेश सोसायटी-भारती यूनिवर्सिटी-पुणे सातारा रोड होते हुए गणेश कला क्रीड़ा रंगमंच पर संपन्न हुई.

Pune- Edition
18-january-2024 Page No. 8
epaper.enavabharat.com

महाराष्ट्र टाईम्स दि. 19/01/2024

# ‘कृषी’ला चालना देण्यासाठी ‘मॅग्नेट’

## एक हजार कोटींची गुंतवणूक; अब्दुल सत्तार यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी एक हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे,’ अशी माहिती पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी नुकतीच दिली. ‘शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यापर्यंत अनुदान देण्यात येत असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन प्रकल्पाचा लाभ घ्यावा,’ असे आवाहन त्यांनी केले.

बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थांसाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, ‘मॅग्नेट’चे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उप प्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, केपीएमजीच्या सहयोगी संचालक मेघना पांडे, विविध शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित होते.

‘शेतीच्या उत्पन्नात वाढ करणे, शेतकऱ्यांच्या क्षमता विकसित करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता; तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे आणि प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या दृष्टीने या प्रकल्पाद्वारे काम होईल,’ असे सत्तार यांनी सांगितले.

> “ शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट व्हावी, यासाठी संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सरकारच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, शेतमालाला देश व विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, नाशवंत मालाची मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत.
>
> – अब्दुल सत्तार, पणनमंत्री





# मॅग्नेट सारख्या प्रकल्पातील अडचणी सोडवणार : सत्तार

## पुण्यात शेतकरी उत्पादक संस्थेसाठी तंत्रज्ञान कार्यशाळेचे उद्‌घाटन

**अॅग्रोवन वृत्तसेवा दि. 19/01/2024**

पुणे : राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून शेतमाल प्रक्रिया आणि निर्यातीला प्रोत्साहन देत संस्था आणि शेतकरी अधिक सक्षम करण्यासाठी मॅग्नेट सारखे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. हे प्रकल्प राबविताना संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न सुरू आहेत. यासाठी पणन कायद्यात बदल देखील करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार दिली.

आशियाई विकास बँक (एडीबी)च्या सहकार्याने राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेसाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी बुधवारी (ता. १७) ते बोलत होते. या वेळी राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उपप्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, केपीएमजीच्या सहयोगी संचालक मेघना पांडेआदी उपस्थित होते.




**पुणे : एडीबी बँकेच्या सहकार्याने मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यासाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेचे उद्‌घाटन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्याहस्ते झाले. या वेळी डावीकडून आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, श्री. सत्तार, पणन संचालक केदारी जाधव आणि प्रकल्प संचालक विनायक कोकरे.**

### अकराशे कोटींचा मॅग्नेट प्रकल्प

फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरिता १ हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. सत्तार यांनी केले.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2024-01-18 | Page- 2
epaper.mahamtb.con

# पौष्टिक तृणधान्य महोत्सव पुण्यात सुरू

## कृषी पणन मंडळाचा उपक्रम, ५ दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पुणे, दि. १७ : प्रतिनिधी**

तृणधान्य सेवनाचे लाभ नागरिकांपर्यंत नेण्याचे आवाहन राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले. यात महिला बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था आणि स्टार्टअप कंपन्या सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत आयोजित पाच दिवसीय तृणधान्य महोत्सवाचे उद्घाटन श्री गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट, राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास राज्याचे पणन संचालक डॉ. केदारी जाधव, पणन उपसंचालक मधुकांत गरड, नाबार्डचे सरव्यवस्थापक पराते, राजेश महाजन हे यावेळी उपस्थित होते.



### विविध कार्यक्रमांचे आयोजन

मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व यांविषयी नामांकित तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन असा भरगच्च कार्यक्रम येत्या पाच दिवसांत असणार असून, त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले.

तृणधान्य महोत्सवाचे उद्घाटन झाल्यावर पणन मंत्र्यांनी महोत्सवातील स्टॉलला भेट देऊन, बचत गटांच्या महिलांनी उत्पादित केलेल्या विविध भरड धान्यांचे उपपदार्थांचा स्वाद घेतला. तृणधान्य महोत्सव घेण्याबाबत महिला बचत गटांच्या ज्या अडचणी असतील त्या सोडविण्याबाबत पणन मंत्र्यांनी सूचना केल्या.

या महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टर्ट कंपन्या सहभागी होणार आहेत. यात सहभागी उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले असून, पुणेकरांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीन्यपूर्ण अशी असंख्य उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल पुणेकर ग्राहकांनी समाधान व्यक्त केले.

Powered by iDocuments

दै. संध्या दि. 18/01/2024

# शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध व्हावा : पणनमंत्री अब्दुल सत्तार

पुणे (दै. संध्या)

राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट, सक्षम व्हावी यासाठी त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासनाच्यावतीनं प्रयत्न करण्यात येणार असल्याची ग्वाही राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार दिली. बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेच्यासाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देश आणि विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे. नाशवंत मालाला मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी, यासाठी शेतकरी




येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरुप बदलही करण्यात येत असल्याचे सत्तार म्हणाले.

फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरीता 1 हजार 100 कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस

जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे आणि साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे.

## कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल व्हावा

राज्यातील विविध भागात वेगवेगळ्या प्रकारची पीके, फळे, कृषी मालाचे उत्पादन करण्यात येते. दोन दिवसीय कार्यशाळेत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नाविन्यपूर्ण माहितीचे आदान-प्रदान करावे. राज्याच्या विविध भागात शेतकरी उत्पादक कंपनी निर्माण झाली पाहिजे. अशा प्रकारच्या कार्यशाळा राज्यात विभागनिहाय आयोजित कराव्यात, या माध्यमातून मॅग्नेट प्रकल्पाविषयी अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचवावी. यामुळे आगामी काळात कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येईल, असा विश्वासही सत्तार यांनी व्यक्त केला.

टक्क्यापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सत्तार यांनी केले.

मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी उभी करतांना बिगर शेती, बांधकाम, वीज आदी बाबत अडी-अडचणी आल्यास मॅग्नेट प्रकल्पाच्या संचालक मंडळाशी

आणि बँकेने समन्वय साधून, शेतकऱ्याच्या अडीअडचणीच्या अनुषंगाने सकारात्मक मार्ग काढून अधिकाधिक शेतकरी या प्रकल्पात सहभागी होईल, यादृष्टीने प्रयत्न करावे. प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एखादी

याबाबत विचार करावा. याकरीता निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही सत्तार यांनी दिली.

फलोत्पादन पिकांची स्थानिक बाजारपेठ, प्रक्रीया आणि निर्यातीसाठी असलेली संधी पाहता वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था व मूल्यसाखळी गुंतवणूकदार यांना फलोत्पादन पिकांच्या सुधारित जाती, काढणीपश्चात व्यवस्थापन, पायाभूत सुविधांची उभारणी व बाजारपेठेबाबत माहिती आदीबाबत अद्ययावत माहीती व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अवगत असणे ही काळाची गरज आहे. यादृष्टीने विविध प्रशिक्षण आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करावे. शेतकरी उत्पादक संस्थांची निवड करुन विदेशात त्यांचे अभ्यास दौरे आयोजित करावेत, राज्यातील शेतकरी सक्षम झाल्यास देशाची अर्थव्यवस्था मजबुत होण्यास मदत

सकाळ

# ‘बचत गटांच्या समस्या सोडवू’

महिला बचत गटाचे उत्पादन वाढावे, व्यवसाय वृद्धिंगत व्हावा, त्यांना कायमचे स्टॉल मिळावे यासाठी महापालिका स्तरावर बाजारपेठ मिळण्यासाठी शहरात विविध ठिकाणी जागा उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना कर्ज घेताना, व्यवसाय करताना काही समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही सत्तार यांनी दिली.

## भरडधान्य खरेदीचा लाभ घेण्याचे आवाहन

■ प्रास्ताविकात कदम म्हणाले, “भरडधान्याची ग्राहकामध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहेत. या महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याबद्दल नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार- विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम होणार असून, ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा.''

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळातर्फे गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे आयोजित भरडधान्य महोत्सवाचे उद्घाटन सत्तार यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते.

पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन उपस्थित होते. या वेळी मंत्री सत्तार यांनी 'मिलेट बाईक रॅली'ला हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ केला.

सत्तार म्हणाले, ''महोत्सवाच्या निमित्ताने ग्राहकांना भरडधान्याच्या फायद्यांची माहिती द्यावी. भरडधान्याचे प्रकृतीवर चांगले परिणाम होत असून, त्याचे सेवन करणे आरोग्यासाठी उत्तम आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष म्हणून साजरे केले. अशा उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी भरडधान्य मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे.''

Pune, Main
18/01/2024 Page No. 2

पुण्य नगरी

# पोषक तृणधान्य खरेदीसह महोत्सवातील कार्यक्रमांचा लाभ घ्या

## पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचे आवाहन



पुणे : प्रतिनिधी

आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पौष्टिक तृणधान्याचा नागरिकांनी दैनंदिन आहारामध्ये समावेश करून आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे, असे आवाहन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' च्या उद्घाटन प्रसंगी सत्तार बोलत होते. यावेळी पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन, मंगेश कदम आदी उपस्थित होते.

सत्तार म्हणाले, येणाऱ्या पिढीला तृणधान्याचे महत्व कळणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्राहकांमध्ये पौष्टिक तृणधान्याचा प्रचार, प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने सामान्य ग्राहकांना तृणधान्याच्या फायद्यांची माहिती देण्यात यावी. नागरिकांनी रासायनिक प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे टाळावे. निरोगी राहणे ही प्रत्येकाची मालमत्ता आहे. तृणधान्याचे प्रकृतीवर चांगले परिणाम होत असून त्याचे सेवन करणे आरोग्यासाठी उत्तम आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. अशा उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे.

महिला बचत गटाचे उत्पादन वाढावे व त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत व्हावा यासाठी त्यांना कायमचे स्टॉलच्या माध्यमातून महापालिकास्तरावर बाजारपेठ मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना कर्ज घेताना, व्यवसाय करताना काही अडीअडचणी, समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

संजय कदम म्हणाले की, तृणधान्याची ग्राहकामध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहेत. या महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार- विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम होणार आहेत. यावेळी मंत्री सत्तार यांनी विविध स्टॉलची पाहणी करून तृणधान्यच्या जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या मिलेट बाईक रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ केला.

### नावीन्यपूर्ण उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध

२१ जानेवारीपर्यंत पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यांनी विविध तृणधान्य उत्पादनांचे स्टॉल लावले आहेत. त्या माध्यमातून ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळ, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

Smart Pune Edition
Jan 18, 2024 Page No. 02
Powered by : eReleGo.com

दि. 18/01/2024

# तृणधान्यांचा मेवा अस्सल गावरान...

## महोत्सव सुरू : राज्य कृषि पणन मंडळाचा उपक्रम

प्रभात वृत्तसेवा



पुणे : तृणधान्याचे महत्त्व याविषयी पणन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी बाइक रॅली काढत जनजागृती केली.

**पुणे, दि. १७ -** मानवी आहारात प्रामुख्याने समावेश असावा, अशी तृणधान्ये पुणेकरांच्या भेटीला आली आहेत. अस्सल गावरान आणि पौष्टिक असलेला हा मेवा आरोग्यदायी मानला जातो.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने पुढाकार घेऊन हा महोत्सव सुरू केला आहे. यात प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा आदी तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा रवा, लाह्या, बिस्किटे, इडली-मिक्स, डोसा मिक्स अशी नावीन्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. स्वारगेट येथील श्री गणेश कला क्रीडा मंच येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. दि. २१ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. यावेळी पणन संचालक डॉ. केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, नाबार्डचे सरव्यवस्थापक पराते, उपसरव्यवस्थापक राजेश महाजन उपस्थित होते. या महोत्सवात तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, विविध स्टार्ट कंपनी सहभागी आहेत. त्यांच्यासाठी सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

यावेळी मंडळाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शहरात बाइक रॅली काढून तृणधान्याचे सेवनाचा प्रसार करत नागरिकांना माहिती दिली. दरम्यान, येथे शेतकरी आणि नागरिकांसाठी पुढील चार दिवस मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केल्याची माहिती कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

# 'तंदुरुस्त राहण्यासाठी दैनंदिन आहारात तृणधान्ये आवश्यक'

लोकसत्ता प्रतिनिधी दि. 18/01/2024

**पुणे :** आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पौष्टिक तृणधान्यांचा नागरिकांनी दैनंदिन आहारामध्ये समावेश करावा. बदललेल्या जीवनशैलीत तंदुरुस्त राहण्यासाठी तृणधान्यांचा आहारातील समावेश गरजेचा आहे, असे मत पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित पौष्टिक तृणधान्य महोत्सव-२०२४चे उद्घाटन सत्तार यांच्या हस्ते झाले. या वेळी पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

मंत्री सत्तार म्हणाले, की तरुण पिढीला तृणधान्याचे महत्त्व कळणे आवश्यक आहे. शहरी ग्राहकांमध्ये पौष्टिक तृणधान्याचा प्रचार, प्रसिद्धी होणे गरजेचे आहे. तृणधान्यांचा आरोग्यावर चांगला परिणाम होत असून, सर्वच तृणधान्ये आरोग्यासाठी उत्तम आहेत. सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले आहे. तरीही अशा आरोग्यदायी उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी वर्षीही मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे.

## महोत्सव रविवारपर्यंत

**हा महोत्सव २१ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे. महोत्सवात राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियेमध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरीउत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या सहभागी झाल्या आहेत. ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नावीन्यपूर्ण उत्पादने उपलब्ध असणार आहेत.**

लोकमत

# जनताच ठरवते सत्तेत कोण राहणार ?

## पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचे मत; पणन विभागाकडून मिलेट महोत्सवाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'देशात पुढील ३० वर्षे भाजपची सत्ता असावी, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना वाटत आहे. पण जनता निर्णय घेत असते. ज्यांचे जास्त खासदार त्यांची सत्ता असते. मात्र, राज्यात पुढील ३० वर्षे एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री राहतील असे मला वाटते,' असा विश्वास पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला. जनता आमच्यासोबत आहे असा दावाही त्यांनी या वेळी केला.

पणन विभागाच्या एका कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. त्यावेळी, अमित शाह यांच्या सत्तेबाबतच्या वक्तव्याविषयी त्यांनी हे मत व्यक्त केले. 'हवेची दिशा मी पाहत नाही. माणसं पाहून, पक्ष पाहून मी काम करतो,' असे सांगत 'आजची पुण्यातील हवा थंडगार आहे,' अशी मिश्कील टिपण्णीही त्यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी केलेल्या दाव्याबाबत ते म्हणाले, "उद्धव ठाकरे यांनी केलेल्या आरोपांत तथ्य नाही. युती का तोडली याचे उत्तर त्यांनीच द्यावे. आजही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना मुख्यमंत्री, आम्ही दैवत मानतो. तर उद्धव ठाकरे संभ्रम निर्माण करत आहेत,' असा आरोप त्यांनी केला. ठाकरे आता सर्वोच्च न्यायालयात जाणार आहेत; पण न्यायालयात आम्हाला न्याय मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

'शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्याबाबत बोलणे योग्य नाही, असे सांगून त्यांच्या वक्तव्यावर बोलणे त्यांनी टाळले. जेवढे संख्याबळ आमच्याकडे होते तेवढेच संख्याबळ अजित पवार यांच्याकडे आहे. त्यामुळे आमच्यासारखाच आमदार पात्रतेबाबतचा निर्णय अजित पवार यांच्याबाबत लागेल, असे मला वाटते, असेही ते म्हणाले.



मिलेट महोत्सवातील बचत गटांच्या स्टॉलला भेट देताना पणनमंत्री अब्दुल सत्तार.

### नवीन विधानसभा बांधणार

राज्यात ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत महिलांची संख्या वाढत आहे. त्यामुळे राजकारणात महिलांना ३३ टक्के आरक्षण देणे गरजेचे आहे. विधानसभेतही महिलांची संख्या वाढली पाहिजे, असे सांगून, दिल्लीतील नव्या लोकसभेच्या धर्तीवर राज्यात नवी विधानसभा बांधण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याबाबत अंतिम निर्णय लवकरच मुख्यमंत्री जाहीर करतील, असेही ते म्हणाले.

## 'महिला बचत गटांना कायमचे स्टॉल देण्यासाठी प्रयत्न'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** आरोग्याच्या दृष्टीने पौष्टिक तृणधान्ये अतिशय महत्त्वाची आहेत. त्यामुळे नागरिकांनी दैनंदिन आहारामध्ये तृणधान्यांचा समावेश करून आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे, असे आवाहन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले. महिला बचत गटांनी तृणधान्याधारित उत्पादन जास्तीत जास्त करावे आणि त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत व्हावा, यासाठी त्यांना स्टॉलच्या माध्यमातून महापालिका स्तरावर कायमची बाजारपेठ मिळावी, यासाठी प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना कर्ज घेताना, व्यवसाय करताना काही अडीअडचणी, समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

सत्तार म्हणाले, "संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. अशा उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे. तृणधान्य महोत्सवाची ही संकल्पना खूप चांगली आहे." यावेळी सत्तार यांनी मिलेट बाइक रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. हा महोत्सव २१ जानेवारीपर्यंत सुरू असून राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यांनी विविध तृणधान्य उत्पादनांचे स्टॉल लावले आहेत.

ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, आदी उत्पादने थेट उत्पादकांकडून विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

दि. 18/01/2024

केसरी
: www.dailykesari.com



पु

# 'शेतकरी उत्पादक संस्थांच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न करणार'

**पुणे** : राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट, सक्षम व्हाव्यात याकरिता या संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार दिली.

बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेच्यासाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उपप्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, केपीएमजीच्या सहयोगी संचालक मेघना पांडे, विविध शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

सत्तार म्हणाले, राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देश व विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, नाशवंत मालाला मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरूप बदलही करण्यात येत आहेत.

फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरीता १ हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सत्तार यांनी केले.

**मॅग्नेट प्रकल्पात अधिकाधिक शेतकरी सहभागी व्हावेत**

मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी उभी करताना बिगर शेती, बांधकाम, वीज आदी बाबत अडी-अडचणी आल्यास मॅग्नेट प्रकल्पाच्या संचालक मंडळाशी चर्चा करावी. संचालक मंडळ आणि बँकेने समन्वय साधून, शेतकऱ्याच्या अडीअडचणीच्या अनुषंगाने सकारात्मक मार्ग काढून अधिकाधिक शेतकरी या प्रकल्पात सहभागी होईल, यादृष्टीने प्रयत्न करावे. प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एखादी नवीन योजना आणता येईल, याबाबत विचार करावा. याकरीता निधीची कमतरता पडू देणार नाही, अशीही ग्वाही सत्तार यांनी दिली.

कार्यशाळेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल होण्यास मदत राज्यातील विविध भागात वेगवेगळ्या प्रकारची पीके, फळे, कृषी मालाचे उत्पादन करण्यात येते. दोन दिवसीय कार्यशाळेत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नाविन्यपूर्ण माहितीचे आदान-प्रदान करावी. राज्याच्या विविध भागांत शेतकरी उत्पादक कंपनी निर्माण झाली पाहिजे. अशा प्रकारच्या कार्यशाळा राज्यात विभागनिहाय आयोजित कराव्यात, या माध्यमातून मॅग्नेट प्रकल्पाविषयी अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचवावी. यामुळे आगामी काळात कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येईल, असा विश्वासही मंत्री सत्तार यांनी व्यक्त केला.

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
18 Jan 2024 - Page 5

# बालेवाड़ी में प्रौद्योगिकी कार्यशाला का उद्घाटन

**किसान उत्पादक संगठनों को मजबूत करने का सरकार का प्रयासः अब्दुल सत्तार**

महानगर नेटवर्क

पुणे

राज्य के विपणन मंत्री अब्दुल सत्तार ने आश्वासन दिया कि राज्य में किसान उत्पादक संगठनों को मजबूत और अधिक सक्षम बनाने के लिए इन संगठनों की समस्याओं को हल करने का प्रयास किया जाएगा। वह बालेवाड़ी में एशियाई विकास बैंक योजना के तहत राज्य में किसान उत्पादक संगठन के लिए आयोजित एक प्रौद्योगिकी कार्यशाला के उद्घाटन पर बोल रहे थे।




इस अवसर पर महाराष्ट्र राज्य कृषि विपणन निगम के कार्यकारी निदेशक संजय कदम, मैग्नेट के परियोजना निदेशक विनायक कोकरे, अतिरिक्त परियोजना निदेशक डॉ. अमोल यादव, उप परियोजना निदेशक नितिन पाटिल, एशियन डेवलपमेंट बैंक के कृष्ण रौतेला, राघवेंद्र नादुविनमणि, केपीएमजी की एसोसिएट निदेशक मेघना पांडे, विभिन्न किसान उत्पादक कंपनियों के प्रतिनिधि उपस्थित थे।

मंत्री श्री. सत्तार ने कहा, राज्य के किसान आर्थिक रूप से समृद्ध हों, उनके कृषि उत्पादों को देश-विदेश में उचित मूल्य मिले, मंदी के दौर में खराब होने वाले सामान का भंडारण हो सके, आयात पर रोक लगे, इसके लिए किसानों के हित में कानून बनाये जा रहे हैं. और कृषि उत्पादों का निर्यात आसानी से किया जा सकेगा। मौजूदा नियमों में समय-समय पर बदलाव भी किये जाते रहते हैं। बागवानी क्षेत्र में कृषि व्यवसाय को बढ़ावा देने के लिए 1 हजार 100 करोड़ रुपये की महाराष्ट्र एग्रीबिजनेस नेटवर्क (मैग्नेट) परियोजना सभी जिलों में लागू की जा रही है।

# पौष्टिक तृणधान्याचा आहारात समावेश करावा : मंत्री सत्तार

## पुण्यातील पाच दिवसीय मिलेट महोत्सवाचे उद्घाटन

**पुणे :** ''आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पौष्टिक तृणधान्यांचा नागरिकांनी दैनंदिन आहारात समावेश करून आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे,'' असे आवाहन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' च्या उद्घाटन प्रसंगी सत्तार बोलत होते. या वेळी पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

सत्तार म्हणाले, ''येणाऱ्या पिढीला तृणधान्यांचे महत्त्व कळणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्राहकांमध्ये पौष्टिक तृणधान्यांचा प्रचार, प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने सामान्य ग्राहकांना तृणधान्याच्या फायद्यांची माहिती द्यावी. ग्राहकांनी मिलेट महोत्सवाला भेट देऊन खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.''



**पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळातर्फे स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित 'मिलेट महोत्सवात बुधवारी (ता.१७) उत्पादनांची पाहणी करताना मंत्री अब्दुल सत्तार.**

''नागरिकांनी रासायनिक प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे टाळावे. तृणधान्यांचे सेवन करणे आरोग्यासाठी उत्तम आहे. तृणधान्य महोत्सवाची ही संकल्पना खूप चांगली आहे. महोत्सवात सर्वसामान्य ग्राहकांना स्टॉलद्वारे विविध तृणधान्यांचे पदार्थ खरेदी करण्यास प्रोत्साहन मिळेल,'' असे सत्तार म्हणाले.

### तृणधान्यांच्या उत्पादनांचे आकर्षण

हा महोत्सव रविवार (ता. २१) पर्यंत असेल. यात राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्यांनी विविध तृणधान्य उत्पादनांचे स्टॉल लावले आहेत. ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी उत्पादने थेट उत्पादकांकडून खरेदी करता येतील.

Pune, Main
18/01/2024 Page No. 5

दि. 18/01/2024

# शेतकरी उत्पादक संस्था बळकट करण्याचे शासनाचे प्रयत्न : पणन मंत्री अब्दुल सत्तार




**पुणे :** राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट, सक्षम व्हावी याकरीता या संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार दिली.बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेच्यासाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उप प्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, केपीएमजीच्या सहयोगी संचालक मेघना पांडे, विविध शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. पणन मंत्री श्री. सत्तार म्हणाले, राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देश व विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, नाशवंत मालाला मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरूप बदलही करण्यात येत आहेत.

फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी मॅग्नेट प्रकल्पफलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरीता १ हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे .शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. सत्तार यांनी केले.मॅग्नेट प्रकल्पात अधिकाधिक शेतकरी सहभागी व्हावेतमॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी उभी करतांना बिगर शेती, बांधकाम, बीज आदी बाबत अडी-अडचणी आल्यास मॅग्नेट प्रकल्पाच्या संचालक मंडळाशी चर्चा करावी. संचालक मंडळ आणि बँकेने समन्वय साधून, शेतकऱ्याच्या अडीअडचणीच्या अनुषंगाने सकारात्मक मार्ग काढून अधिकाधिक शेतकरी या प्रकल्पात सहभागी होईल, यादृष्टीने प्रयत्न करावे. प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एखादी नवीन योजना आणता येईल, याबाबत विचार करावा. याकरीता निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही श्री. सत्तार यांनी दिली.

फलोत्पादन पिकांची स्थानिक बाजारपेठ, प्रक्रीया व निर्यातीसाठी असलेली संधी पाहता वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था व मूल्यसाखळी गुंतवणूकदार यांना फलोत्पादन पिकांच्या सुधारित जाती, काढणीपश्चात व्यवस्थापन, पायाभूत सुविधांची उभारणी व बाजारपेठेबाबत माहिती आदीबाबत अद्ययावत माहीती व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अवगत असणे ही काळाची गरज आहे.

यादृष्टीने विविध प्रशिक्षण आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करावे. शेतकरी उत्पादक संस्थांची निवड करुन विदेशात त्यांचे अभ्यास दौरे आयोजित करावेत, राज्यातील शेतकरी सक्षम झाल्यास देशाची अर्थव्यवस्था मजबुत होण्यास मदत होईल, असेही श्री. सत्तार म्हणाले. कार्यशाळेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल होण्यास मदतराज्यातील विविध भागात वेगवेगळ्या प्रकारची पीके, फळे, कृषी मालाचे उत्पादन करण्यात येते. दोन दिवसीय कार्यशाळेत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नाविन्यपूर्ण माहितीचे आदान-प्रदान करावी. राज्याच्या विविध भागात शेतकरी उत्पादक कंपनी निर्माण झाली पाहिजे.

अशा प्रकारच्या कार्यशाळा राज्यात विभागनिहाय आयोजित कराव्यात, या माध्यमातून मॅग्नेट प्रकल्पाविषयी अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचवावी. यामुळे आगामी काळात कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येईल, असा विश्र्वासही मंत्री श्री.सत्तार यांनी व्यक्त् केला. श्री. कोकरे यांनी मॅग्नेट प्रकल्पाविषयी माहिती दिली. यावेळी श्री. सत्तार यांच्या हस्ते कृषी तंत्रज्ञान कार्यशाळा- मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत नवीन व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासाठी अर्थसहाय्य या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

दि. 18/01/2024

# पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते मिलेट महोत्सवाचे उद्घाटन

**पुणे / प्रतिनिधी**

आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पौष्टिक तृणधान्याचा नागरिकांनी दैनंदिन आहारामध्ये समावेश करुन आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे, असे आवाहन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' च्या उद्घाटन प्रसंगी श्री. सत्तार बोलत होते. यावेळी पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

मंत्री सत्तार म्हणाले, येणाऱ्या पिढीला तृणधान्याचे महत्व कळणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्राहकांमध्ये पौष्टिक तृणधान्याचा प्रचार, प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने सामान्य ग्राहकांना तृणधान्याच्या फायद्यांची माहिती देण्यात यावी. ग्राहकांनी मिलेट महोत्सवाला भेट देऊन खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले, नागरिकांनी रासायनिक प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे टाळावे. निरोगी राहणे ही प्रत्येकाची मालमत्ता आहे. तृणधान्याचे प्रकृतीवर चांगले परिणाम होत असून त्याचे सेवन करणे आरोग्यासाठी उत्तम आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. अशा उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे. तृणधान्य महोत्सवाची ही संकल्पना खूप चांगली आहे. महोत्सवात सर्वसामान्य ग्राहकांना स्टॉलच्या माध्यमातून विविध तृणधान्यचे पदार्थ खरेदी करण्यास प्रोत्साहन मिळेल, असेही श्री. सत्तार म्हणाले.



महिला बचत गटाचे उत्पादन वाढावे व त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत व्हावा यासाठी त्यांना कायमचे स्टॉलच्या माध्यमातून महापालिकास्तरावर बाजारपेठ मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना कर्ज घेताना, व्यवसाय करताना काही अडीअडचणी, समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

प्रास्ताविकात श्री. कदम म्हणाले की, तृणधान्याची ग्राहकामध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहेत. या महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार- विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम होणार असून ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी मंत्री सत्तार यांनी विविध स्टॉलची पाहणी करून तृणधान्यच्या जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या मिलेट बाईक रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. सारस बाग चौक- एलबीएस रोड-म्हात्रे ब्रीज-नळ स्टॉप-कर्वे रस्ता- डेक्कन-टिळक रोडमार्गे गणेश कला क्रीडा रंगमंच येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. तर दुसऱ्या रॅलीचा सारस बाग चौक -शिलाई चौक-स्वारगेट- सेव्हन लव्ह चौक- गांगाधाम चौक-बिबवेवाडी चौक, महेश सोसायटी-भारती विद्यापीठ- पुणे सातारा रोडमार्गे गणेश कला क्रीडा रंगमंच येथे समारोप करण्यात आला. २१ जानेवारी पर्यंत पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यांनी विविध तृणधान्य उत्पादनांचे स्टॉल लावले आहेत. त्या माध्यमातून ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

दि. 18/01/2024

# पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते मिलेट महोत्सवाचे उद्घाटन

## पोषक तृणधान्य खरेदीसह महोत्सवातील कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांचे आवाहन



**पुणे :** आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पौष्टिक तृणधान्याचा नागरिकांनी दैनंदिन आहारामध्ये समावेश करुन आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे, असे आवाहन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' च्या उद्घाटन प्रसंगी श्री. सत्तार बोलत होते. यावेळी पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

मंत्री सत्तार म्हणाले, येणाऱ्या पिढीला तृणधान्याचे महत्व कळणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्राहकांमध्ये पौष्टिक तृणधान्याचा प्रचार, प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने सामान्य ग्राहकांना तृणधान्याच्या फायद्यांची माहिती देण्यात यावी. ग्राहकांनी मिलेट महोत्सवाला भेट देऊन खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

ते म्हणाले, नागरिकांनी रासायनिक प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे टाळावे. निरोगी राहणे ही प्रत्येकाची मालमत्ता आहे. तृणधान्याचे प्रकृतीवर चांगले परिणाम होत असून त्याचे सेवन करणे आरोग्यासाठी उत्तम आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. अशा उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे. तृणधान्य महोत्सवाची ही संकल्पना खूप चांगली आहे.

महोत्सवात सर्वसामान्य ग्राहकांना स्टॉलच्या माध्यमातून विविध तृणधान्यचे पदार्थ खरेदी करण्यास प्रोत्साहन मिळेल, असेही श्री. सत्तार म्हणाले.

महिला बचत गटाचे उत्पादन वाढावे व त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत व्हावा यासाठी त्यांना कायमचे स्टॉलच्या माध्यमातून महापालिकास्तरावर बाजारपेठ मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना कर्ज घेताना, व्यवसाय करताना काही अडीअडचणी, समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

प्रास्ताविकात श्री. कदम म्हणाले की, तृणधान्याची ग्राहकामध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहेत. या महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार- विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम होणार असून ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी मंत्री सत्तार यांनी विविध स्टॉलची पाहणी करून तृणधान्यच्या जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या मिलेट बाईक रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. सारस बाग चौक- एलबीएस रोड-म्हात्रे ब्रीज-नळ स्टॉप-कर्वे रस्ता-डेक्कन-टिळक रोडमार्गे गणेश कला क्रीडा रंगमंच येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. तर दुसऱ्या रॅलीचा सारस बाग चौक -शिलाई चौक-स्वारगेट-सेव्हन लव्ह चौक-गांगाधाम चौक-बिबवेवाडी चौक, महेश सोसायटी-भारती विद्यापीठ-पुणे सातारा रोडमार्गे गणेश कला क्रीडा रंगमंच येथे समारोप करण्यात आला.

२१ जानेवारी पर्यंत पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यांनी विविध तृणधान्य उत्पदनांचे स्टॉल लावले आहेत. त्या माध्यमातून ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

दि. 18/01/2024

# शेतकरी उत्पादक संस्था बळकट करण्याचे शासनाचे प्रयत्न–पणन मंत्री

**पुणे (प्रतिनिधी)–** राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट, सक्षम व्हावी याकरीता या संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार दिली.

बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेच्यासाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उप प्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, केपीएमजीच्या सहयोगी संचालक मेघना पांडे, विविध शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

पणन मंत्री श्री. सत्तार म्हणाले, राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देश व विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, नाशवंत मालाला मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरूप बदलही करण्यात येत आहेत.



**फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प**

फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरीता १ हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे .शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. सत्तार यांनी केले.

**मॅग्नेट प्रकल्पात अधिकाधिक शेतकरी सहभागी व्हावेत**

मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी उभी करतांना बिगर शेती, बांधकाम, बीज आदी बाबत अडी-अडचणी आल्यास मॅग्नेट प्रकल्पाच्या संचालक मंडळाशी चर्चा करावी. संचालक मंडळ आणि बँकेने समन्वय साधून, शेतकऱ्याच्या अडीअडचणीच्या अनुषंगाने सकारात्मक मार्ग काढून अधिकाधिक शेतकरी या प्रकल्पात सहभागी होईल, यादृष्टीने प्रयत्न करावे. प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एखादी नवीन योजना आणता येईल, याबाबत विचार करावा. याकरीता निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही श्री. सत्तार यांनी दिली.

फलोत्पादन पिकांची स्थानिक बाजारपेठ, प्रक्रीया व निर्यातीसाठी असलेली संधी पाहता वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था व मूल्यसाखळी गुंतवणूकदार यांना फलोत्पादन पिकांच्या सुधारित जाती, काढणीपश्चात व्यवस्थापन, पायाभूत सुविधांची उभारणी व बाजारपेठेबाबत माहिती आदीबाबत अद्ययावत माहीती व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अवगत असणे ही काळाची गरज आहे. यादृष्टीने विविध प्रशिक्षण आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करावे. शेतकरी उत्पादक संस्थांची निवड करुन विदेशात त्यांचे अभ्यास दौरे आयोजित करावेत, राज्यातील शेतकरी सक्षम झाल्यास देशाची अर्थव्यवस्था मजबुत होण्यास मदत होईल, असेही श्री. सत्तार म्हणाले.

राज्यातील विविध भागात वेगवेगळ्या प्रकारची पीके, फळे, कृषी मालाचे उत्पादन करण्यात येते. दोन दिवसीय कार्यशाळेत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नाविन्यपूर्ण माहितीचे आदान-प्रदान करावी.

दि. 18/01/2024

# शेतकरी उत्पादक संस्था बळकट करण्याचे शासनाचे प्रयत्न – अब्दुल सत्तार




पुणे, : राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट, सक्षम व्हावी याकरीता या संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार दिली.

बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेच्यासाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

पणन मंत्री श्री. सत्तार म्हणाले, राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देश व विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, नाशवंत मालाला मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरूप बदलही करण्यात येत आहेत.

फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरीता १ हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे .शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. सत्तार यांनी केले.

मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी उभी करतांना बिगर शेती, बांधकाम, वीज आदी बाबत अडी-अडचणी आल्यास मॅग्नेट प्रकल्पाच्या संचालक मंडळाशी चर्चा करावी. संचालक मंडळ आणि बँकेने समन्वय साधून, शेतकऱ्याच्या अडीअडचणीच्या अनुषंगाने सकारात्मक मार्ग काढून अधिकाधिक शेतकरी या प्रकल्पात सहभागी होईल, यादृष्टीने प्रयत्न करावे. प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एखादी नवीन योजना आणता येईल, याबाबत विचार करावा. याकरीता निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही श्री. सत्तार यांनी दिली.

फलोत्पादन पिकांची स्थानिक बाजारपेठ, प्रक्रीया व निर्यातीसाठी असलेली संधी पाहता वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था व मूल्यसाखळी गुंतवणूकदार यांना फलोत्पादन पिकांच्या सुधारित जाती, काढणीपश्चात व्यवस्थापन, पायाभूत सुविधांची उभारणी व बाजारपेठेबाबत माहिती आदीबाबत अद्ययावत माहीती व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अवगत असणे ही काळाची गरज आहे. यादृष्टीने विविध प्रशिक्षण आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करावे. शेतकरी उत्पादक संस्थांची निवड करुन विदेशात त्यांचे अभ्यास दौरे आयोजित करावेत, राज्यातील शेतकरी सक्षम झाल्यास देशाची अर्थव्यवस्था मजबुत होण्यास मदत होईल, असेही श्री. सत्तार म्हणाले.

दि. 18/01/2024

# पोषक तृणधान्य खरेदीसह महोत्सवातील कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांचे आवाहन



पुणे, : आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पौष्टिक तृणधान्याचा नागरिकांनी दैनंदिन आहारामध्ये समावेश करुन आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे, असे आवाहन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' च्या उद्घाटन प्रसंगी श्री. सत्तार बोलत होते.

मंत्री सत्तार म्हणाले, येणाऱ्या पिढीला तृणधान्याचे महत्व कळणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्राहकांमध्ये पौष्टिक तृणधान्याचा प्रचार, प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने सामान्य ग्राहकांना तृणधान्याच्या फायद्यांची माहिती देण्यात यावी. ग्राहकांनी मिलेट महोत्सवाला भेट देऊन खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

ते म्हणाले, नागरिकांनी रासायनिक प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे टाळावे. निरोगी राहणे ही प्रत्येकाची मालमत्ता आहे. तृणधान्याचे प्रकृतीवर चांगले परिणाम होत असून त्याचे सेवन करणे आरोग्यासाठी उत्तम आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. अशा उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे. तृणधान्य महोत्सवाची ही संकल्पना खूप चांगली आहे. महोत्सवात सर्वसामान्य ग्राहकांना स्टॉलच्या माध्यमातून विविध तृणधान्यचे पदार्थ खरेदी करण्यास प्रोत्साहन मिळेल, असेही श्री. सत्तार म्हणाले.

महिला बचत गटाचे उत्पादन वाढावे व त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत व्हावा यासाठी त्यांना कायमचे स्टॉलच्या माध्यमातून महापालिकास्तरावर बाजारपेठ मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना कर्ज घेताना, व्यवसाय करताना काही अडीअडचणी, समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

प्रास्ताविकात श्री. कदम म्हणाले की, तृणधान्याची ग्राहकामध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहेत. या महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार- विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम होणार असून ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. २१ जानेवारी पर्यंत पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सव सुरु आहे.

दि. 18/01/2024

# शेतकरी उत्पादक संस्था बळकट करण्याचे शासनाचे प्रयत्न : पणन मंत्री अब्दुल सत्तार




**पुणे :** राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था अधिक बळकट, सक्षम व्हावी याकरीता या संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार दिली.बालेवाडी येथे आशियाई विकास बँक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थेच्यासाठी आयोजित तंत्रज्ञान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, उप प्रकल्प संचालक नितीन पाटील, आशियाई विकास बँकेचे क्रिशन रौटेला, राघवेंद्र नदुविनामनी, केपीएमजीच्या सहयोगी संचालक मेघना पांडे, विविध शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. पणन मंत्री श्री. सत्तार म्हणाले, राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला पाहिजे, त्यांच्या शेतमालाला देश व विदेशात योग्य प्रकारे भाव मिळाला पाहिजे, नाशवंत मालाला मंदीच्या काळात साठवणूक करता यावी, शेतीमालाची आयात-निर्यात सुलभरित्या करता यावी यासाठी शेतकरी हिताचे कायदे तयार करण्यात येत आहेत. विद्यमान नियमात काळानुरूप बदलही करण्यात येत आहेत.

फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी मॅग्नेट प्रकल्पफलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरीता १ हजार १०० कोटी रुपयांचा महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, क्षमता विकास करणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे व साठवणूक करणे तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे .शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्क्यापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी होऊन या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. सत्तार यांनी केले.

मॅग्नेट प्रकल्पात अधिकाधिक शेतकरी सहभागी व्हावेतमॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी उभी करतांना बिगर शेती, बांधकाम, वीज आदी बाबत अडी-अडचणी आल्यास मॅग्नेट प्रकल्पाच्या संचालक मंडळाशी चर्चा करावी. संचालक मंडळ आणि बँकेने समन्वय साधून, शेतकऱ्याच्या अडीअडचणीच्या अनुषंगाने सकारात्मक मार्ग काढून अधिकाधिक शेतकरी या प्रकल्पात सहभागी होईल, यादृष्टीने प्रयत्न करावे. प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एखादी नवीन योजना आणता येईल, याबाबत विचार करावा. याकरीता निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही श्री. सत्तार यांनी दिली.

फलोत्पादन पिकांची स्थानिक बाजारपेठ, प्रक्रीया व नियांतीसाठी असलेली संधी पाहता वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था व मूल्यसाखळी गुंतवणूकदार यांना फलोत्पादन पिकांच्या सुधारित जाती, काढणीपश्र्चात व्यवस्थापन, पायाभूत सुविधांची उभारणी व बाजारपेठेबाबत माहिती आदीबाबत अद्ययावत माहीती व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अवगत असणे ही काळाची गरज आहे.

यादृष्टीने विविध प्रशिक्षण आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करावे. शेतकरी उत्पादक संस्थांची निवड करुन विदेशात त्यांचे अभ्यास दौरे आयोजित करावेत, राज्यातील शेतकरी सक्षम झाल्यास देशाची अर्थव्यवस्था मजबुत होण्यास मदत होईल, असेही श्री. सत्तार म्हणाले. कार्यशाळेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल होण्यास मदतराज्यातील विविध भागात वेगवेगळ्या प्रकारची पीके, फळे, कृषी मालाचे उत्पादन करण्यात येते. दोन दिवसीय कार्यशाळेत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नाविन्यपूर्ण माहितीचे आदान-प्रदान करावी. राज्याच्या विविध भागात शेतकरी उत्पादक कंपनी निर्माण झाली पाहिजे.

अशा प्रकारच्या कार्यशाळा राज्यात विभागनिहाय आयोजित कराव्यात, या माध्यमातून मॅग्नेट प्रकल्पाविषयी अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचवावी. यामुळे आगामी काळात कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येईल, असा विश्र्वासही मंत्री श्री.सत्तार यांनी व्यकत् केला. श्री. कोकरे यांनी मॅग्नेट प्रकल्पाविषयी माहिती दिली. यावेळी श्री. सत्तार यांच्या हस्ते कृषी तंत्रज्ञान कार्यशाळा- मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत नवीन व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासाठी अर्थसहाय्य या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

दि. 18/01/2024

# पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते मिलेट महोत्सवाचे उद्घाटन

## पोषक तृणधान्य खरेदीसह महोत्सवातील कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांचे आवाहन

**पुणे :** आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पौष्टिक तृणधान्याचा नागरिकांनी दैनंदिन आहारामध्ये समावेश करुन आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे, असे आवाहन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' च्या उद्घाटन प्रसंगी श्री. सत्तार बोलत होते. यावेळी पणन संचालक केदारी जाधव, उपसंचालक मधुकांत गरड, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन आदी उपस्थित होते.



मंत्री सत्तार म्हणाले, येणाऱ्या पिढीला तृणधान्याचे महत्व कळणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्राहकांमध्ये पौष्टिक तृणधान्याचा प्रचार, प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने सामान्य ग्राहकांना तृणधान्याच्या फायद्यांची माहिती देण्यात यावी. ग्राहकांनी मिलेट महोत्सवाला भेट देऊन खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

ते म्हणाले, नागरिकांनी रासायनिक प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे टाळावे. निरोगी राहणे ही प्रत्येकाची मालमत्ता आहे. तृणधान्याचे प्रकृतीवर चांगले परिणाम होत असून त्याचे सेवन करणे आरोग्यासाठी उत्तम आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. अशा उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी मिलेट महोत्सव सुरू करण्यात आला आहे. तृणधान्य महोत्सवाची ही संकल्पना खूप चांगली आहे. महोत्सवात सर्वसामान्य ग्राहकांना स्टॉलच्या माध्यमातून विविध तृणधान्यचे पदार्थ खरेदी करण्यास प्रोत्साहन मिळेल, असेही श्री. सत्तार म्हणाले.

महिला बचत गटाचे उत्पादन वाढावे व त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत व्हावा यासाठी त्यांना कायमचे स्टॉलच्या माध्यमातून महापालिकास्तरावर बाजारपेठ मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना कर्ज घेताना, व्यवसाय करताना काही अडीअडचणी, समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.प्रास्ताविकात श्री. कदम म्हणाले की, तृणधान्याची ग्राहकामध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहेत.

या महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार- विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम होणार असून ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी मंत्री सत्तार यांनी विविध स्टॉलची पाहणी करून तृणधान्यच्या जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या मिलेट बाईक रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. सारस बाग चौक- एलबीएस रोड-म्हात्रे ब्रीज-नळ स्टॉप-कर्वे रस्ता- डेक्कन- टिळक रोडमार्गे गणेश कला क्रीडा रंगमंच येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. तर दुसऱ्या रॅलीचा सारस बाग चौक -शिलाई चौक-स्वारगेट-सेव्हन लव्ह चौक- गांगाधाम चौक- बिबवेवाडी चौक, महेश सोसायटी- भारती विद्यापीठ- पुणे सातारा रोडमार्गे गणेश कला क्रीडा रंगमंच येथे समारोप करण्यात आला.

२१ जानेवारी पर्यंत पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यांनी विविध तृणधान्य उत्पादनांचे स्टॉल लावले आहेत. त्या माध्यमातून ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

पुढारी

पुढारी ANCHOR

# कृषी पणन मंडळाच्या १६ सुविधांचे विस्तारीकरण होणार

## मॅग्नेट प्रकल्पांतर्गत १४२ कोटींचा खर्च अपेक्षित

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क तथा मॅग्नेट प्रकल्पातंर्गत फलोत्पादन पिकांसाठी मुल्य साखळ्या (व्हॅल्यू चेन) विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या सुमारे पंधरा ते वीस वर्षापूर्वी उभारण्यात आलेल्या प्रिकुलींग, कोल्ड स्टोरेज, पॅक हाऊस आदी प्रकल्पांच्या १६ सुविधांचे विस्तारीकरण करुन दुप्पट क्षमता करण्यात येत असून नव्याने तीन प्रकल्पांची उभारणी सुरु केली आहे. त्यासाठी १४२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती प्रकल्प संचालक विनायक कोकरे यांनी दिली.

निवडण्यात आलेल्या फलोत्पात्पादन क्षेत्रांमध्ये प्रामुख्याने बारामती (जि.पुणे), पाचोड (छत्रपती संभाजीनगर), बीड



**बारामती येथील फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी प्रगतिपथावर आहे.**

(जि.बीड) येथे तीन नवीन अत्याधुनिक सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. तसेच मॅग्नेट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक संस्था, प्रक्रियादार व मुल्य साखळीतील इतर घटकांच्या क्षमता बांधणीसाठी राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेचे (एनआयपीएचटी) बळकटीकरण करण्यात येत आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना कमी व्याज दरामध्ये खेळते भांडवल व मध्यम मुदत कर्ज उपलब्धतेसाठी दोन वित्तीय संस्थांची निवड केली आहे. **(उत्तरार्ध)**

### संत्र्यांच्या चाचण्या

नाशिक येथील सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी या शेतकरी उत्पादक कंपनीने परदेशातून 'शुगर बेली' हे संत्र्यांचे नवीन वाण आयात करुन भारतीय हवामान क्षेत्रात प्रत्येक क्षेत्रावर त्याच्या चाचण्या घेण्यात येत आहेत. त्यासाठी मॅग्नेटअंतर्गत अनुदान देण्यात आले आहे. ही लागवड यशस्वी झाल्यास त्याचा अधिक फायदा शेतकऱ्यांना अपेक्षित असल्याचेही कोकरे यांनी सांगितले.

Pune Edition
Jan 17, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# ‘तृणधान्य महोत्सवा’ला उद्यापासून प्रारंभ

**मार्केट यार्ड, ता. १५ :** कृषिपणन मंडळामार्फत ‘मिलेट महोत्सव-२०२४’ चे आयोजन ‘श्री गणेश कला क्रीडा रंगमंच’ स्वारगेट येथे १७ ते २१ जानेवारी या कालावधीत होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन बुधवारी (ता. १७) पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होईल.

महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियेमध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी, उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्या सहभागी होणार आहेत. ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा तृणधान्ये आणि यांपासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी उत्पादने थेट उत्पादकांकडून ग्राहकांना प्रदर्शन व विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

Pune, Pune-Today
16/01/2024 Page No. 8

पुण्य नगरी

# पुण्यात उद्यापासून 'मिलेट महोत्सव'

## 'उत्पादक ते ग्राहक' संकल्पनेंतर्गत कृषी पणनकडून आयोजन

**मुंबई :** कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव- २०२४' चे उद्घाटन बुधवार, १७ जानेवारी रोजी पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते पुणे येथे होणार आहे. स्वारगेटजवळील गणेश कला क्रीडा रंगमंच येथे १७ ते २१ जानेवारीदरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेंतर्गत विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा यामागील उद्देश आहे.

या महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. याबरोबरच महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम आणि कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

Mumbai Edition
Jan 16, 2024 Page No. 9
Powered by : eReleGo.com

पुढारी

# मॅग्रेट प्रकल्पातून १२६ कोटी अनुदान मंजूर

## आशियाई विकास बँक आणि राज्य सरकार संयुक्त प्रकल्प; एक हजार कोटींच्या प्रकल्पास गती

**पुढारी ANCHOR**

**पुणे** : आशियाई विकास बँक आणि राज्य सरकारच्या सुमारे एक हजार कोटी रुपयांच्या महत्त्वांकांक्षी महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क तथा मॅग्रेटअंतर्गत विविध प्रकल्पांनी आता गती घेण्यास सुरुवात केल्याची माहिती प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे यांनी दिली. शेतमाल काढणीपश्चात पायाभूत सुविधा उभारणीसाठी शेतकरी उत्पादक संस्था व मूल्य साखळी (व्हॅल्यू चेन) गुंतवणूकदारांच्या प्रस्तावांना १२६ कोटी ७६ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापैकी २७ कोटी ९७ लाख रुपयांचे वितरण झाले असून मार्च महिनाअखेर आणखी १९.२९ कोटींचे वितरण अपेक्षित असल्याचे सांगून ते म्हणाले, मॅग्रेट प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, फलोत्पादन व फुल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादनात वाढ करणे,



साठवणूक व प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणीस प्राधान्य देणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्देश आहेत.

राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविला जाणार असून केळी, संत्रा, मोसंबी, सिताफळ, पेरु, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, हिरवी व लाल मिरची, आंबा, लिंबू, काजू, पडवळ व फुले अशा एकूण १५ फलोत्पादन पिकांसाठी उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण अशा एकात्मिक मूल्य साखळ्यांच्या (व्हॅल्यू चेन) विकास विचारात घेऊन मॅग्रेट प्रकल्पाची अंमलबजावणी आता वेगाने सुरु झाली आहे. यामध्ये अस्तित्वात असलेल्या व नव्याने निर्माण होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था, निर्यातदार, प्रक्रियादार, संघटीत किरकोळ विक्रेते, कृषी व्यवसाय करणारे लघु व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसहाय्यता समूहांचा सहभाग असणार आहे. मॅग्रेट प्रकल्पात समाविष्ट फलोत्पादन पिकांमध्ये कामकाज करणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्थांच्या सभासदांना उत्तम कृषी पध्दतीवर प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत ८० प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे १५ हजार ७९४ फलोत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्यामध्ये ३ हजार ९५८ महिला शेतकऱ्यांचा समावेश आहे. शेतकरी उत्पादक संस्थांच्या संचालकांसाठी दोन दिवसीय व्यवस्थापक विषयक ९ प्रशिक्षण कार्यक्रमातून ३०० संचालकांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्यामध्ये ४८ महिला सदस्य आहेत. महिला शेतकरी, उद्योजकांना निर्यातदार बनविण्याच्यादृष्टीने फलोत्पादन निर्यात प्रशिक्षण देण्यात आले. सोलापूर येथील राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रामार्फत डाळींब ज्यूस पावडर आणि नवीन वाणांचा प्रसार या अंतर्गत डाळींबाचा निर्यातक्षम नवीन वाण विकसित करण्यात येत आहे. एकूण ६४ शेतकरी उत्पादक संस्थांचे व्यवसाय विकास आराखडे तयार करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. (पूर्वार्ध)

लोकमंथन दि. 16/01/2024

# पुण्यात १७ जानेवारीपासून 'मिलेट महोत्सव'

**लोकमंथन प्रतिनिधी**

**मुंबई** : कृषी पणन मंडळाच्यावतीने आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' चे उद्घाटन १७ जानेवारी रोजी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते पुणे येथे होणार आहे. गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट, पुणे येथे १७ ते २१ जानेवारी दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा यामागील उद्देश आहे. या महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नाविण्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. याबरोबरच महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम आणि कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले.

# कृषी पणन मंडळाच्या वतीने उद्यापासून 'मिलेट महोत्सव'

**अॅग्रोवन वृत्तसेवा** दि. 16/01/2024



पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' चे उद्घाटन १७ जानेवारी रोजी पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होणार आहे. गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे १७ ते २१ जानेवारी दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा यामागील उद्देश आहे. या महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्या सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. येथे ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नावीन्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. याबरोबरच महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम असणार आहेत. पुण्यातील ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले.

पुढारी

## संक्षिप्त

# कृषी पणन मंडळाचा बुधवारपासून 'मिलेट महोत्सव'

**पुणे** : राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित 'मिलेट महोत्सव २०२४'चे (पौष्टिक तृणधान्य) उद्घाटन १७ जानेवारी रोजी पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होणार आहे. शेतमाल विक्रीव्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा यामागील उद्देश असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. स्वारगेटजवळील गणेश कला क्रीडा केंद्र येथे १७ ते २१ जानेवारीदरम्यान तृणधान्य महोत्सव होत असल्याचे नमूद करून ते म्हणाले की, पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेंतर्गत विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक शेतकरी, तृणधान्य प्रक्रियेत कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्या सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मिलेट महोत्सवात प्रामुख्याने मिलेट उत्पादने, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन आयोजित करण्यात आले आहे. तरी ग्राहकांनी मिलेट खरेदीसह विविध कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहनही कदम यांनी केले.

My Pune Edition
Jan 15, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुण्य नगरी

# कृषी पणन मंडळाच्या वतीने १७ पासून मिलेट महोत्सव

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित 'मिलेट (पौष्टिक तृणधान्य) महोत्सव-२०२४' चे उद्घाटन १७ जानेवारी रोजी पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होणार आहे. गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट येथे १७ ते २१ जानेवारीदरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पणन मंडळामार्फत दर वर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा यामागील उद्देश आहे. या महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागांतून तृणधान्य उत्पादक, तृणधान्य प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्या सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. येथे ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स आदी नावीन्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन, तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. याबरोबरच महोत्सवात मिलेट उत्पादने, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन आदी कार्यक्रम होणार असल्याचे पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

Smart Pune Edition
Jan 14, 2024 Page No. 04
Powered by : eReleGo.com

लोकमान्य सांजवार्ता दि. 13/01/2024

# पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस डाळिंब निर्यात

**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस व्यावसायिक तत्त्वावर भारतातून पहिल्यांदाच डाळिंब निर्यात करण्यात आली आहे. अपेडा, भारत सरकार, एन.पी.पी.ओ., महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व के. बी. एक्सपोर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरिकेत डाळिंब निर्यातीचे नियोजन केले असून, पहिली शिपमेंट नुकतीच फ्लोरिडा शहरात रवाना करण्यात आली. अधिकाऱ्यांच्या तपासणीनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. एकूण ३३६ बॉक्सेसमधून १ हजार ३४४ किलो भगव्या प्रतीचे डाळिंब हवाईमार्गे पाठविण्यात आले.

निर्यातीसाठीचे माइट वॉश, सोडियम हायपोक्लोराइड प्रक्रिया, वॉशिंग ड्राइंग प्रक्रिया करून निश्चित केलेल्या मानांकनानुसार डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करणे आवश्यक आहे. अमेरिकेने घातलेली निर्यातबंदी उठवल्याने डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधेचा वापर करून डाळिंब निर्यातीची संधी असून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात निर्यात करावी, असे आवाहन पणन मंडळाचे सहायक सरव्यवस्थापक सतीश वाघमोडे यांनी केले आहे. भारतीय डाळिंबाम ध्ये कर्करोगापासून लढण्यासाठी लागणारे अँटी ऑक्सिडंट असल्याने अमेरिकेत डाळिंबाला असलेली वाढती मागणी लक्षात घेऊन जास्तीत जास्त उत्पादकांनी या सुविधेचा वापर करावा, असेही वाघमोडे यांनी कळविले आहे.



सन २०१७-२०१८ मध्ये डाळिंबाच्या दाण्यामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अमेरिकेने भारतातून डाळिंब आयात करण्यास बंदी घातली होती. त्यामुळे गेली पाच-सहा वर्षे अमेरिकेस डाळिंब निर्यात होऊ शकली नाही. बंदी उठवणेबाबत अपेडा व एन.पी.पी. ओ. भारत सरकार यांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा करून ही निर्यात बंदी उठवावी यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यानुसार सन २०२२ पासून अमेरिकेने घातलेली निर्यातबंदी उठवली. मात्र, त्यासाठी काही नियम व अटी घालण्यात आल्या आहे. कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विकिरण सुविधा केंद्र या ठिकाणी अमेरिकन निरीक्षक यांच्या उपस्थितीत डोझमॅपिंग करून सुविधा अद्ययावत करण्यात आली. या प्रसंगी एन.पी.पी.ओ. मुंबईचे असिस्टंट डायरेक्टर एन. के. मीना, अपेडा मुंबईचे सहायक व्यवस्थापक पी. ए. बामने, निर्यातदार कौशल खक्कर, कृषी पणन मंडळाचे सहायक सरव्यवस्थापक सतीश वाघमोडे, व्यवस्थापक डॉ. केदार तुपे तसेच एन.पी.पी.ओ., अपेडा व पणन मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी या सर्वांच्या उपस्थितीत अमेरिकन निरीक्षक लुईस यांनी डाळिंबाच्या कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला व व्यावसायिक तत्त्वावर अमेरिकेतील फ्लोरिडा या शहरात पाठविण्यात आले.

दि. 12/01/2024

# कृषि पणन मंडल द्वारा 17 से 21 जनवरी का मिलेट महोत्सव संपन्न



पुणे, २३ जनवरी (भा.प्र.): संयुक्त राष्ट्र ने वर्ष २०२३ को 'अंतर्राष्ट्रीय पौष्टिक अनाज वर्ष' के रूप में मनाया है। चलो भीइस अवसर पर देशभर में विभिन्न गतिविधियां आयोजित की गईं। अनाजों की पौष्टिकता के कारण आम उपभोक्ताभारी आकर्षण के कारण 'श्री गणेश कला क्रीड़ा रंगमंच' द्वारा 'बाजरा महोत्सव-२०२४' का आयोजन किया जाता है। यह १७ से २१ जनवरी, २०२४ तक स्वारगेट, पुणे में आयोजित किया गया था। चलो भीमहोत्सव का उद्घाटन बुधवार १७ जनवरी को अल्पसंख्यक विकास मंत्री अब्दुल सत्तार द्वारा किया गयाऔकाफ़, विपणन, महाराष्ट्र राज्य और अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड, पुणे द्वारा संचालित। त्योहार के दौरान, राज्य के विभिन्न हिस्सों से खाद्यान्न उत्पादक, बचत प्रक्रिया में काम करते हैं समूह, सहकारी समितियाँ, किसान उत्पादक कंपनियाँ, स्टार्ट-अप कंपनियाँ शामिल थीं। इस त्यौहार में बाजरानिर्माताओं को ४० स्टॉल उपलब्ध कराए गए। उपभोक्ता प्रामाणिक ज्वार, बाजरी, रागी, भागर, का आनंद ले सकते हैं।राला, सामा, कोदरा जैसे अनाज और इनसे तैयार बाजरा रवा, बाजरे की भूसी,रागी बिस्कुट, सोरघम इडली-मिक्स, रागी डोसा मिक्स आदि जैसे कई नवीन उत्पाद। निर्माताओं द्वारा प्रदर्शन के साथ-साथ बिक्री के लिए भी उपलब्ध कराया जाता है। इसके साथ ही बाजरा उत्पादन भी, मूल्य वर्धित प्रसंस्करण उत्पादों, स्वास्थ्य महत्व पर प्रसिद्ध विशेषज्ञों द्वारा निर्देशित व्याख्यान,क्रेता-विक्रेता मिलन का भव्य कार्यक्रम आयोजित किया गया। कृषि विपणन बोर्ड के कार्यकारी निदेशक श्री. संजय कदम, महाप्रबंधक, महोत्सव में विनायक कोकरे ने बाजरा उत्पादकों से बाजरा के विपणन पर चर्चा कीसमस्याओं पर चर्चा की. बाजरा उत्पादन, मूल्य वर्धित प्रसंस्करण उत्पाद, स्वास्थ्य महत्व पर प्रसिद्ध विशेषज्ञों द्वारा मार्गदर्शन प्रदान किया गया। इस पर ग्राहकों की प्रतिक्रियाघरेलू व्यापार और निर्यात के लिए उपभोक्ताओं और बाजरा उत्पादकों के बीच समन्वय स्थापित करकेलाया गया था नये साल की शुरूआत